RNI- MAHMAR2003/14666
L/130/RNP/Renewal/2021-23
SHIV VANI

# शिव वाणी

सडेतोड आणि परखड विचारांची सत्यवाणी


बीड | साप्ताहिक | मराठी | वर्ष २२ वे | अंक २४ | सोमवार दि.२३ जुन २०२५ | Mo.9422748792/ 9822628521 | पाने : ४ | किंमत ०३ ₹

Beed (Maharashtra) | Weekly | MARATHI | Year-22 | Issue -24 | MONDAY DT.23 JUNE 2025 | RNI- MAHMAR2003/14666 | PAGES - 4 | PRICE - 3 RUPEES

## रान डुक्करांच्या हल्ल्यात शेतकऱ्याचा मृत्यू

धारूर । प्रतिनिधी

धारूर तालुक्यात रानडुक्करांच्या त्रासाला शेतकरी वैतागलेले आसतानाच एक अंत्यत दुखत व वाईट घटना घडली आहे. रूई धारूर येथील शेतकरी प्रकाश गोविंदराव तिडके वय ५७ वर्षे यांचा डुक्करांच्या हल्ल्यात मृत्यू झाला आहे. या बाबत सविस्तर घटना अशी की,रुई धारूर येथील प्रतिष्ठित व सांप्रदायिक क्षेत्रातील व्यक्तीमत्व प्रकाश गोविंदराव तिडके हे सकाळी पाच वाजता आपल्या घरून शेतात दुध आणायला मोटारसायकल वरून जात आसताना गावाजवळील ओढ्याजवळ चार ते पाच डुक्करांच्या कळपाने अचानक त्यांच्यावर हल्ला केला.या हल्ल्यात ते रोडवर पडले त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली.त्यांना तात्काळ लातूर येथील सह्याद्री हॉस्पीटल येथे दाखल केले परंतू डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.रानडुक्करांच्या हल्ल्याने एक निष्पाप शेतकऱ्यांचा नाहक जीव गेला या मुळे गावात व परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.यापूर्वी पण या मार्गावर एक घटणा घडलेली आहे. वनविभागाचे तालुक्यातील रानडुक्करांचा बंदोबस्त करावा अशी जनतेची मागणी आहे.



# पाऊले चालती दिवे घाटाची वाट

पुणे : प्रतिनिधी

आषाढी एकादशीसाठी मानाच्या पालख्यांसह शेकडो दिंड्यांनी पंढरीची वाट धरली असून, लाडक्या विठुरायाच्या भेटीसाठी वारकरी मजल-दरमजल करत पाऊले टाकत आहेत. आज संत ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखीचे पुण्यातून सासवडच्या दिशेने प्रस्थान झाले. आज या पालखीने अवघड असा दिवेघाट पार केला.

दिवे घाट पार करताना घाटाने जणू हिरवा शालू नेसल्यासारखे दिसत होते. पांडुरंग हरी विठ्ठल श्री ज्ञानदेव तुकाराम असा जयघोष करत अवघा दिवे घाट आज दुमदुमला होता. संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीसोबत आज हजारो वारक-यांची पाऊले दिवे घाटात चालताना पाहायला मिळाली. निसर्ग सौंदर्याने नटलेला, हिरवळीने सुंदर सजलेला दिवे घाट टाळ मृदुंगाच्या गजराने दुमदुमला होता.

संत ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखीचे दिवे घाटात दर्शन घेण्यासाठी हजारो भाविकांनी मोठी गर्दी केली होती. मुखी पांडुरंगाचा जयघोष, हाती टाळ, मृदुंग, डोक्यावर तुळस आणि विठ्ठलभक्तीचा आनंद लुटत वारकरी तल्लीन झाल्याचे पाहायला मिळाले.आज २२ जून रोजी पालखी सासवडचा दिवेघाट पार करून उद्या सासवडला पोहोचेल. २३ जूनचा पालखीचा मुक्काम सासवड येथे असणार असून २४ जून रोजी सासवड ते जेजुरी असा पालखीचा प्रवास राहील. जेजुरीनगरीत पालखीवर भंडा-याची उधळण होणार आहे.



# शिक्षणाधिकार्यांचे काळे कारनामे पुन्हा चर्चेत येवू लागले भगवान फुल्लारी बीईओ लक्ष्मण बेडसकरवर मेहरबान

### नियुक्ती न देण्याची तक्रार बेकायदेशीरपणे काढली निकाली, सादेक इनामदार यांची शिक्षणाधिकार्यांविरोधात पुन्हा सीईओंकडे तक्रार

बीड (प्रतिनिधी)

शिक्षणाधिकारी भागवान फुल्लारी यांचे काळे कारनामे पुन्हा चर्चेत येवू लागले आहेत. फुल्लारी आणि केजचे बीईओ लक्ष्मण बेडसकर या दोघांची मिलीभगत आहे. त्यामुळे फुल्लारी सातत्याने बेडसकरवर मेहरबान होत आहेत. नियुक्ती न देण्याची तक्रार फुल्लारी यांनी बेकायदेशीरपणे निकाली काढली आहे. त्यामुळे भ्रष्टाचार निर्मूलनचे राष्ट्रीय अध्यक्ष इंजि सादेक इनामदार यांनी पुन्हा सीईओंकडे लेखी तक्रार केली आहे. या तक्रारीवर आता सीईओ जितीन रहमान नेमकी कोणती कारवाई करतात याकडे लक्ष लागले आहे.

केज येथील प्रभारी गटशिक्षणाधिकारी बेडसकर यांच्यावर लाचेचा गुन्हा आहे. तरीही त्यांना तेथीलच पदभार देण्यात आला. हा पदभार काढून इतरत्र बदली करावी, अशी मागणी करण्यात आली होती. परंतू तक्रारच बेकायदेशीरपणे निकाली काढून पाठराखण करण्याचे काम बीडचे शिक्षणाधिकारी भगवान फुल्लारी हे करीत आहेत, अशी तक्रार भ्रष्टाचार निर्मूलन समितीचे राष्ट्रीय अध्यक्ष शेख सादिक इनामदार यांनी सीईओ जितीन रहमान यांच्याकडे केली आहे. केजचे प्रभारी गटशिक्षणाधिकारी लक्ष्मण बेडसकर यांच्यावर लाच घेताना मागील काळामध्ये गुन्हा दाखल झाला होता. तर ३१ डिसेंबर २०२४ रोजी मुख्याध्यापकामार्फत विडा शिक्षकाकडून लाच मागीतली होती त्या प्रकरणात सुध्दा प्रभारी गटशिक्षणाधिकारी लक्ष्मण बेडसकर यांचा रोल होता परंतू शासनाच्या नियमाला डावलून पदाचा गैरवापर करून तत्कालीन मुख्य कार्यकार्यांची दिशाभूल करून परत परत ज्या ठिकाणी लाच घेतली होती त्या ठिकाणी प्रभारी गटशिक्षण अधिकार्याचा पदभार बेडसकर यांना देण्यात आला. या विरोधात सादेक इनामदार यांनी तक्रार केली होती. त्या तक्रारी अर्जावर तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने यांनी रिमार्क करून तात्काळ अहवाल सादर करा, असे आदेश दिले. परंतू त्यांची बदली होताच व नवीन सीईओ जितीन रहमान यावर कारवाई करतील या भीतीपोटी शिक्षणाधिकारी भगवान फुल्लारी यांनी तो अर्ज बेकायदेशीररित्या निकाली काढला आहे. आपण तो अर्ज परत मागवून घेवून चौकशी करून योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी सादेक इनामदार यांनी सीईओ जितीन रहमान यांच्याकडे केली आहे. त्यानुसार आता यामध्ये नवे सीईओ नेमकी कोणती कारवाई करतात

## केज शहरातील तालुका कृषी अधिकारी कार्यालय गायब ?




केज/प्रतिनिधी

केज शहरातील मुख्य रस्त्यावर असलेले तालुका कृषी अधिकारी कार्यालय अचानक कोणतीही पुर्व सुचना न देता गायब झाले असून शेतकऱ्यांना आपल्या अडचणी सोडविण्या साठी कोठे जायचे असा यक्ष प्रश्न पडला आहे. याबाबत सविस्तर माहिती अशी की,केज तालुक्यातील शेतकरी बांधवांच्या अडचणी सोडविण्यासाठी महाराष्ट्र शासनाने कृषी कार्यालय केज येथे एसटी डेपो जवळ कार्यान्वित होते.परंतु सदरील जागेवर आता कृषी विभाग कार्यालय नसुन कुठलीही पुर्व सुचना न देता हे तालुका कृषी अधिकारी कार्यालय केज येथुन गायब झाले आहे.या बाबत चौकशी केली असता हे तालुका कृषी कार्यालय हे गावाच्या बाहेर बीड रोडवर दुसऱ्या मजल्यावर स्थीत असल्याचे दिसून आले.आता या तालुका कृषी कार्यालयात जाण्यासाठी दिव्यांग बांधव शेतकऱ्यांनी कसे जायचे असा यक्ष प्रश्न पडला आहे कारण कार्यालय दुसऱ्या मजल्यावर असल्याने दिव्यांग बांधवांना वर कसे जायचे हेकळायला मार्ग नाही तर सदरील कार्यालय शहरात असणे आवश्यक असताना गावाबाहेर देण्यामागील उद्देश काय हे गुपीत उलगडले नाही शेतकऱ्यांना आता तालुका कृषी कार्यालयात जाण्यासाठी आर्थिक दंड सोसावा लागत आहे.शेतकरी बांधवांच्या मदतीसाठी सदरील कार्यालयाने शहरामध्ये कार्यालय आणावे अशी मागणी शेतकरी बांधव करत आहेत.

# पेरणीची लगबग: गाव ओसाड, शेतात राबणारे हात!

परळी / प्रतिनिधी

परळी वैजनाथ आणि परिसरातील गावांमध्ये पेरणीच्या कामाला वेग आला आहे. शेतकरी पहाटेपासूनच आपल्या कुटुंबासह शेतात राबत असल्याने, सध्या अनेक गावांमध्ये दिवसा घरांना कुलूप दिसू लागले आहेत. एरवी गजबजलेली गावाची मुख्य चौक, किराणा दुकाने आणि इतर सार्वजनिक ठिकाणे ओस पडलेली दिसत आहेत.यावर्षी पावसाने वेळेवर हजेरी लावल्याने शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.मान्सुमपूर्व पावसामुळे जमिनी पेरणीयोग्य झाल्या आहेत. त्यामुळे शेतकरीवर्ग सोयाबीन, कापूस आणि इतर पिकांच्या पेरणीसाठी रात्रंदिवस एक करत आहेत.



ग्रामीण भागामध्ये शेतीची कामे सुरू झाल्याने आता परळी शहरात येणाऱ्या नागरिकांची संख्या एकदम रोडावली आहे. यामुळे ग्रामीण भागातील नागरिकांच्या वास्तव्याने नेहमी गर्दीत रहाणारे परळी शहर आता सुने सुने लागत आहे. शहरातील बहुतेक रस्ते सुने दिसत होते तर कोणत्याही दुकानात म्हणावी तशी गर्दी ही दिसत नव्हती. शेतीची मशागत आणि पेरणी झाल्याशिवाय आता शहरात गर्दी होणार नसल्याचे दिसत आहे.यावर्षी वरुण राजाने लवकरच दमदार हजेरी लावली आहे. अगदी मे महिन्याच्या मध्यापासून जोरदार पाऊस झाल्याने बळीराजा यावर्षी मिरगी पेर करण्याच्या तयारीत लागला आहे. अचानक मे महिन्यातच दमदार पाऊस झाल्याने बळीराजाला मशागतीची कामेही उरकती घ्यावी लागली आहेत. जिल्ह्यात दमदार पाऊस झाल्याने अगदी नदी नाल्यांना पाणी आले आहे. यामुळे बळीराजा सुखावला असून पावसाच्या भरवशावर पेरणीला सुरुवात झाली आहे.

मजुरांची टंचाई आणि वाढीव दर:पेरणीच्या कामासाठी मजुरांची मोठी मागणी वाढली आहे. मात्र, उपलब्ध मजुरांची संख्या कमी असल्याने मजुरीचे दर वाढले आहेत. अनेक ठिकाणी मजुरीसाठी जादा पैसे मोजावे लागत असल्याची शेतकऱ्यांची चर्चा आहे. कुटुंबातील सर्व सदस्य शेतात राबत असल्याने, गावांमध्ये लहान मुले आणि वृद्ध व्यक्तीच जास्त प्रमाणात दिसून येत आहेत.

# लोकनेते आ.सुरेश धस यांच्या प्रयत्नातून कर्हेवडगाव ग्रामपंचायतला ९० घरकुले मंजूर - परिवंत गायकवाड

### आ.धस यांचे गायकवाड दांपत्यांनी मानले आभार

आष्टी (प्रतिनिधी)

पंतप्रधान घरकुल आवास योजना - ग्रामीण अंतर्गत २०२५ - २६ करिता कर्हेवडगाव ग्रामपंचायत साठी ९० घरकुले आमदार सुरेश धस यांनी केलेल्या वेळोवेळी पाठपुराव्याने मंजूर केले असून केंद्र सरकार, राज्य सरकार व लोकाभिमुख नेतृत्व आमदार सुरेश धस यांचे आभार कर्हेवडगाव ग्रामपंचायतचे सरपंच सौ. वंदना परिवंत गायकवाड व शासकीय गुत्तेदार परिवंत गायकवाड या दांपत्यांनी मानले आहेत.

आष्टी, पाटोदा, शिरूर मतदार संघाचे लोकनेते व सर्व अठरापगड जातीला सोबत घेऊन विकासगंगा मतदारसंघात आमदार सुरेश धस यांच्या रूपाने येणार असून पंतप्रधान घरकुल योजनेअंतर्गत आष्टी मतदार संघाला १८ हजार ७ लाभार्थ्यांना घरकुले मंजूर झाले आहेत. यामध्ये कर्हेवडगाव ग्रामपंचायत साठी



९० घरकुले आमदार सुरेश धस यांच्या प्रयत्नाने मंजूर झाले असून यासाठी त्यांनी वेळोवेळी पाठपुरावा केला आहे. यामध्ये सर्व जाती धर्मातील लाभार्थ्यांना हा लाभ मिळणार असून या लाभार्थ्यांनी आमदार सुरेश धस यांचे जाहीर आभार मानले आहेत.

आष्टी तालुक्यातील कर्हेवडगाव येथे आ. सुरेश धस यांच्या प्रयत्नातून मंजूर झालेल्या पंतप्रधान घरकुल योजनेच्या ९० लाभार्थींच्या खात्यावर घरकुलाचा पहिला हप्ता जमा झाला आहे अशी माहिती सरपंच सौ. वंदना परिवंत गायकवाड यांनी दिली. गावातील वंचितांना हक्काचे घरकुल मिळावे, यासाठी आ. सुरेश धस यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामपंचायतीने पाठपुरावा केला. त्यातून गावात रमाई ३२ घरकुले मंजूर झाली तर पंतप्रधान घरकुल योजनेतून मंजूर झालेल्या १९२ पैकी ९० लाभार्थींच्या खात्यावर पहिला हप्ता जमा झाला आहे. उर्वरित १०२ घरकुलांना नव्याने मंजुरी मिळालेली असून, त्यांचाही हप्ता लवकरच जमा होणार आहे. सर्व जाती धर्माच्या गरजू लाभार्थांच्या हक्काच्या घरकुलाचे स्वप्न प्रत्यक्षात उतरल्याने ग्रामस्थांमध्ये समाधान असल्याचे सरपंच गायकवाड यांनी सांगितले. यासाठी ग्रामपंचायतचा जागा उपलब्धेप्रमाणे पीटीआर किंवा सातबारा, आधार बँक पासबुक या आवश्यक कागदपत्राची पूर्तता संबंधित गावातील ग्रामसेवक किंवा ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांच्याकडे करावेत. घरकुल यादीत दिलेल्या लाभार्थ्यांनी नियमाप्रमाणे कागदपत्रे ऑनलाइन प्रणाली मार्फत करून घ्यावेत म्हणजे लाभार्थ्यांच्या खात्यात घरकुलाचा हप्ता वितरण जमा होण्यास सुलभ जाईल. माझ्या ग्रामपंचायतला आमदार सुरेश धस यांनी घरकुले मंजूर करून दिल्याबद्दल केंद्र सरकार, राज्य सरकार व सदैव जनसेवेत असलेले नेतृत्व आमदार सुरेश धस यांचे जाहीर आभार कर्हेवडगाव ग्रामपंचायतचे सरपंच सौ. वंदना परिवंत गायकवाड व शासकीय गुत्तेदार परिवंत गायकवाड या दांपत्यांनी मानले आहेत.

# एच.पी.एम.चा बेजबाबदार कारभार ; केज बसस्थानका समोरील पुल वापरण्या आधीच कोसळला !

### गुण नियंत्रक पथक नुसते नावालाच आहे काय? प्रवाशांचा सवाल

केज /प्रतिनिधी

केज शहरातील बस स्थानका समोरील वाहतुकीसाठी नव्याने उभारण्यात आलेला पूल अवघ्या काही तासातच खचल्याने आणि त्यातील लोखंडी सळया बाहेर पडल्याने प्रवाशांच्या सुरक्षेचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे.विशेष म्हणजे,हा पुल अजून वाहतुकीस अधिकृतपणे खुला देखील झाला नव्हता, तरीदेखील एकच वाहन गेल्यानंतर या पुलावर खड्डा पडल्याची घटना समोर आली आहे.केज बसस्थानकात वाहने ये-जा करण्या साठी बाहेर निघणाऱ्या मार्गावरून नाल्याचे काम नुकतेच पूर्ण झाले आहे.या नाल्यावर पुल बांधण्याचे काम एच. पी.एम.कंपनीकडे सोपवण्यात आले होते. मात्र,कंपनीने अत्यंत हलगर्जीपणे व निकृष्ट दर्जाचे काम केल्याचे या घटनेवरून स्पष्ट होते.जनतेकडून असा प्रश्न निर्माण होतो की, सार्वजनिक ठिकाणी, विशेषतः प्रवाशांच्या दैनंदिन वापरातील रस्ते व पूल बांधताना प्रशासन आणि ठेकेदार कंपन्या इतक्या बेफिकीर कशा राहू शकतात ? केवळ दाखवण्यापुरते काम करून करोडोंच्या निधी चा अपव्यय आणि नागरिकांच्या जिवाशी खेळ,हे



थांबवण्यासाठी प्रशासन काय पावले उचलणार आहे?

स्थानिक नागरिकांनी दिलेल्या माहितीनुसार, पुलावर एक वाहन गेल्यानंतर तिथे मोठा खड्डा पडला आणि त्यातून बाहेर आलेल्या तुटलेल्या लोखंडी सळया स्पष्टपणे दिसून येत आहेत.हे दृश्य केवळ लाजिरवाणे नसून धोकादायक देखील आहे.जर हा पूल अधिक वेळ उपयोगात राहिला असता,तर एखाद्या मोठ्या अपघाताची शक्यता नाकारता येत नाही.या प्रकारामुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप पसरला आहे. प्रवाशांना बसस्थानकात येण्यास आणि तिथून बाहेर पडण्यास आता अडचणींचा सामना करावा लागत आहे. विशेषतः महिला,वृद्ध आणि विद्यार्थ्यांना यामुळे अधिक त्रास सहन करावा लागत आहे.स्थानिक नागरिक आणि प्रवासी यांच्या कडून एच.पी.एम. कंपनीवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली जात आहे.यासोबतच, जिल्हा प्रशासनाने या प्रकरणाची चौकशी करून जबाबदार अधिकाऱ्यांवरही कारवाई करावी,अशी मागणी जोर धरू लागली आहे.गुण नियंत्रण पथकाने गाढ झोपेतून जागे होऊन प्रवाशांच्या जीवाशी खेळणाऱ्या गुत्तेदाराचा बंदोबस्त करण्यासाठी पाउले उचलावीत अशी मागणी प्रवाशांकडून होत आहे.



# संपादकीय

## प्रतीक्षा योग्य वेळेची!

राज्यात महायुतीचे सरकार आल्यानंतर सर्व शेतक-यांना कर्जमाफी देण्यात येईल, असे आश्वासन माजी मुख्यमंत्री आणि आताचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले होते. या आश्वासनाबाबत महायुतीच्या जाहीरनाम्यातही उल्लेख होता. मात्र आता या सरकारला सहा महिन्यांचा काळ लोटला तरीही आश्वासनपूर्ती करता आलेली नाही. अजूनही शेतक-यांना कर्जमाफी देण्यात आलेली नाही. कर्जमाफी मिळावी म्हणून शेतकरी संघटनांनी आंदोलने केली. प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष, माजी आमदार बच्चू कडू यांनी अन्नत्यागही केला. पण सरकारकडून केवळ आम्ही कर्जमाफी देऊ असे सांगण्यात येते. कर्जमाफीसंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकतेच सूचक विधान केले आहे. सरकार कर्जमाफीबाबत एकही शब्द फिरवणार नाही असे म्हटले आहे. परंतु फिरवाफिरवी हा तर राजकारणाचा आणि पर्यायाने राजकीय नेत्यांचा स्थायीभाव आहे. भाकरी का करपली, पान का सडले, घोडा का अडला याचे उत्तर 'न फिरवल्याने' असेच आहे.

त्यामुळे सरकार एकही शब्द फिरवणार नाही असे म्हणत असले तरी शब्द फिरवला जाणार ही काळ्या दगडावरची पांढरी रेघ आहे अथवा पांढ-या दगडावरची काळी रेघ आहे! मुख्यमंत्री फडणवीस शनिवारी योग दिनाच्या निमित्ताने पुण्यात होते. यावेळी त्यांनी वारकरी आणि पुणेकरांसोबत योगासने केली. या कार्यक्रमानंतर त्यांनी प्रसार माध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांना शेतकरी कर्जमाफीबाबत विचारणा करण्यात आली तेव्हा फडणवीस म्हणाले, कर्जमाफी कधी करायची याचे काही नियम आणि पद्धत आहे. सर्व बाबी तपासून याबाबतचा निर्णय योग्य वेळी घेण्यात येईल. पण या कर्जमाफीबाबत सरकारने दिलेला एकही शब्द हे सरकार फिरवणार नाही. योग्यवेळी हा निर्णयसुद्धा राज्य सरकार निश्चितपणे घेईल. म्हणजे मुख्यमंत्र्यांनी चेंडू प्रश्न विचारणा-यांच्या, कर्जमाफीची आस बाळगून असणा-यांच्या कोर्टात टाकला आहे. उगीच काहीतरी विचारणा-यांनी योग्य वेळ कधी येईल ते शोधत बसायचे. त्यामुळे मुख्यमंत्री महोदयांनी सांगितल्याप्रमाणे शेतक-यांच्या कर्जमाफीची योग्य वेळ नेमकी कधी येणार आणि शेतक-यांना प्रत्यक्षात कर्जमाफी कधी मिळणार, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

युक्रेन-रशिया युद्ध कधी संपणार, इस्रायल-इराण तणाव कधी निवळणार हे निश्चितपणे सांगता येते का? मग कर्जमाफीसंबंधीची योग्य वेळ कधी येईल हे निश्चितपणे सांगता येईल? तेव्हा अशा प्रकारचे भोळेभाबडे प्रश्न विचारून मुख्यमंत्र्यांचा लाख मोलाचा वेळ वाया घालवणे निश्चितच योग्य नाही. जागतिक योग दिनानिमित्त मुख्यमंत्री 'वारकरी भक्तियोग' कार्यक्रमात उपस्थित होते. मुख्यमंत्री नियमितपणे योगसाधना करीत नसले तरी विरोधकांचे वार शांतपणे सहन करताना आणि परतवून लावताना त्यांनी साध्य केलेली साधना अव्हेरून कसे चालेल?


### कागदपत्रे हरवली आहेत

श्रुती कृष्णा गर्जे यांचे बीड ते पाटोदा प्रवासादरम्यान दहावी पासचा १)शालेय दाखला २)मार्कमेमो ३)जातीचा दाखला ४) सनद इत्यादि कागदपत्रे हरवली आहेत.कोणाला सापडल्यास संपर्क मो.नं. ७४९८२०३५३५


# संस्थाचालक आणि मित्र परिवार यांच्या उपस्थितीत रंगला प्रा.डॉ.सुनील पंढरे यांचा सेवापूर्ती समारंभ

आष्टी (प्रतिनिधी)

कडा येथील अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळ संचालित गांधी महाविद्यालयातील क्रीडा संचालक प्रा. डॉ. सुनील पंढरे यांचे नियत वयोमानानुसार सेवानिवृत्ती सोहळा पार पडला. संस्थेचे पदाधिकारी मित्रपरिवार आणि आप्तस्वकीय यांच्या उपस्थितीमध्ये रंगतदार सोहळा पार पडला.अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष कांतीलालशेठ चाणोदिया, अमोलक ट्रस्टचे अध्यक्ष गोकुळशेठ मेहेर, अमोलक ट्रस्टचे उपाध्यक्ष बाबुशेठ भंडारी, योगेश भंडारी, कांतीलाल चाणोदिया, प्रधानमंत्री हेमंत पोखरणा, डा. उमेश गांधी, संचालक संजय मेहेर, प्राचार्य डॉ. ज. मो. भंडारी, आनंदराव धोंडे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हरिदास विधाते, आष्टी तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष इंजि. किशोर हंबर्डे, प्राचार्य डॉ. सोपानराव निंबोरे, भाजपा प्रदेश उपाध्यक्ष वाल्मीकतात्या निकाळजे, अधिवक्ता परिषदेचे प्रदेश उपाध्यक्ष ज्येष्ठ विधीज्ञ बाबुराव अनारसे, ज्येष्ठ पत्रकार प्रफुल्ल सहस्त्रबुद्धे, दैनिक झुंजारनेताचे उपसंपादक उत्तम बोडखे, मच्छिंद्रनाथ मल्टीस्टेटचे चेअरमन नामदेव राऊत, बीड येथील नवगण बीपीएड कॉलेजचे प्राचार्य डॉ. सूर्यकांत धोंडे, जामखेड येथील सामाजिक कार्यकर्ते संजय कोठारी, राजेश मोरे, सेवानिवृत्त पोलीस उपनिरीक्षक सुभाष महाडिक, प्रशांत सहस्त्रबुद्धे, प्रशांत काटेकर, उपनगराध्यक्ष शैलेश सहस्त्रबुद्धे, राजेश राऊत, मिलींद देशमुख, इंग्लिश माध्यम शाळेच्या प्राचार्या गुंदेचा, सुभाष बोदांर्डे, शाम भोजने, प्रदीप सहस्त्रबुद्धे प्रशांत सहस्त्रबुद्धे, प्रा. डा. विनोद ढोबळे, डा. सचिन पटवा, विक्रम खेडकर, प्रा. डा. बाळासाहेब धोंडे, प्रा. डा. भास्कर चव्हाण, सुभाष रासकर, संपत गाडे पाटील, प्रा. डा. मुस्ताक पानसरे, गोरक्षनाथ सायकड या मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये हा सोहळा पार पडला.

यावेळी प्रस्ताविक प्राचार्य डा. ज. मो. भंडारी यांनी केले. यावेळी प्राचार्य डा. सुर्यकांत धोंडे, डा. प्रशांत सहस्त्रबुद्धे, पत्रकार उत्तम बोडखे, जेष्ठ पत्रकार प्रफुल्ल सहस्त्रबुद्धे, नामदेव राऊत, संजय मोरे, बाबुराव अनारसे, वाल्मिकतात्या निकाळजे, डा. उमेश गांधी, डा. सचिन पटवा यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी बोलताना पत्रकार उत्तम बोडखे यांनी सुनील पंढरे यांचेविषयी महाविद्यालयीन आठवणी जागवत त्यांना शुभेच्छा दिल्या. जेष्ठ पत्रकार प्रफुल्ल सहस्त्रबुद्धे यावेळी बोलताना म्हणाले की, सुनील पंढरे यांच्यावर विद्यार्थी तसेच राष्ट्रवादी विचाराचे संस्कार झाले असून सेवानिवृत्तीनंतर त्यांनी या ध्येयाने प्रेरित होऊन समाजात काम करावे असे आवाहन केले. यावेळी बोलताना विधीज्ञ बाबुराव अनारसे यांनी अमोलक संस्थेच्या वरिष्ठ महाविद्यालयाच्या परवानगी वेळी तत्कालीन उपमुख्यमंत्री लोकनेते स्व. गोपीनाथराव मुंडे यांचेकडे स्व. रूपचंद गांधी आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यकर्त्यांनी केलेल्या विनंतीमुळे त्यांनी तात्काळ वरिष्ठ महाविद्यालय सुरू करण्यास परवानगी दिली आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाची संलग्नता मिळवून दिली. संस्थेच्या उज्वल कामगिरी मध्ये



प्रा. डॉ. सुनील पंढरे यांचा मोठा वाटा आहे. अमोलक संस्थेला वरिष्ठ महाविद्यालयाची परवानगी मिळवुन देण्यात रा. स्व. संघाच्या लोकांचे मोठे योगदान आहे. उर्वरीत काळात प्रा. पंढरे सरांनी रा. स्व. संघाचे पुर्णवेळ कार्यकर्ता म्हणून काम करावे असे आवाहन केले. भाजपाचे प्रदेश उपाध्यक्ष वाल्मीक निकाळजे यांनी सुनील पंढरे खेळाचे शिक्षक असून त्यांनी ऑलिंपियन अविनाश साबळे यांना शालेय जीवनामध्ये मार्गदर्शन केल्यामुळे यशस्वी झाले असल्याचे सांगितले. अमोलक संस्थेचे प्रधानमंत्री हेमंत पोखरणा यांनी संस्थेची प्रगती आणि पुढील योजनांची माहिती देताना संस्थेमध्ये यापुढे आर्टीफिशियल इंटेलिजन्सवर लक्ष केंद्रित करण्यात येणार असून लवकरच अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू करण्यात येणार असल्याचे सांगितले. सामाजिक कार्यकर्ते बाबुशेठ भंडारी यांनी सुनील पंढरे यांची संस्थेला मार्गदर्शनाची आवश्यकता वाटेल त्यावेळेस त्यांनी यावे असे आवाहन केले. संचलन प्रा. डा. अनिल गर्जे यांनी तर आभार प्रशांत सहस्त्रबुद्धे यांनी मानले.

## अपात्र केलेल्या सरपंच / सदस्य यांना पात्र ठरवण्याच्या लढ्यास यश – दत्ता काकडे, प्रा.ईश्वर मुंडे

धारूर । प्रतिनिधी

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागास प्रवर्ग यांच्याकरता राखीव असलेल्या जागेसाठी निवडणूक लढवणारे व्यक्तीस जात वैधता प्रमाणपत्र अधिनियम २००४ तरतुदीनुसार एक वर्षात सादर करणे आवश्यक असते. सन २०२२ ते २०२५ या कालावधीतील ग्रामपंचायत सार्वत्रिक व पोट निवडणूक मध्ये राखीव प्रवर्गातून निवडून आलेल्या ग्रामपंचायत सरपंच सदस्य यांनी जात वैधता प्रमाणपत्र विहित मुदतीत सादर न केल्यामुळे राखीव प्रवर्गातून निवडून आलेल्या ग्रामपंचायत सरपंच/ सदस्यांना अपात्र ठरवण्यात आले होते.

या अपात्रतेच्या विरोधात राष्ट्रवादी काँग्रेस चे नेते प्रा.ईश्वर मुंडे यांनी आ.जयंत पाटील यांच्या कडे ही माहिती सादर केली होती.आ.जयंत पाटील यांनी विधानसभेत व सरपंच परिषद मुंबई यांच्या वतीने राज्याध्यक्ष दत्ता काकडे यांनी आ.श्रीकांत भारतीय यांच्या मार्फत विधान परिषदेत आवाज उठवला होता. तसेच ग्राम विकास मंत्री ना.जयकुमार गोरे यांच्या कडे पाठपुरावा केल्यानंतर या पुढे एक वर्षाची मुदत वाढ देण्याची घोषणा विधानसभेत केली होती. त्या नुसार महाराष्ट्र शासनाने दि. १ऑगस्ट २०२२ रोजी किंवा त्यानंतर आदेशाच्या



प्रारंभीच्या दिनांकापर्यंत घेण्यात आलेल्या ग्रामपंचायत सदस्यांच्या /सरपंचाच्या/ सभासदाच्या अध्यक्षांच्या आणि सदस्यांच्या व सभापतीच्या राखीव जागेवर निवडून आलेल्या व्यक्तींना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्याची मुदतवाढ या आदेशाच्या दिनांकपासून बारा महिन्याची मुदत शासन राजपत्र दि. ३०/०४/२०२५ अन्वये देण्यात आली त्या मुळे राखीव प्रवर्गातून निवडून आलेल्या ग्रामपंचायत सरपंच/सदस्यांना पात्र करण्यात आले आहे. जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार या सरपंच व सदस्य यांनी आपला पदभार घेऊन कामकाज सुरू केले आहे. अखेर अपात्र ठरवलेल्या सरपंच सदस्य यांना पात्र करण्याच्या लढ्याला यश मिळाले असे मत सरपंच परिषद मुंबई चे प्रदेशाध्यक्ष दत्ता काकडे व राष्ट्रवादीचे नेते प्राध्यापक ईश्वर मुंडे यांनी व्यक्त करून या लढ्यात प्रत्यक्ष अप्रत्यक्ष सहकार्य करणा-या सर्वांचे आभार मानले आहेत.

## गंगाई फार्मसी कॉलेज कडा येथील विद्यार्थ्यांचे घवघवीत यश

आष्टी(प्रतिनिधी)

आनंद चरीटेबल संस्था संचलीत गंगाई फार्मसी कॉलेज कडा, ता. आष्टी, जि. बीड या कॉलेजचा प्रथम वर्षाचा निकाल ९३% व द्वितीय वर्षाचा निकाल ९१% लागला असून या सर्व उत्तीर्ण झालेल्या तसेच विशेष गुण प्रविण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांचे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मा. आ. भीमरावजी धोंडे साहेब तसेच संस्थेचे सह सचिव डॉ. अजय (दादा) भीमराव धोंडे व संचालक अभयराजे धोंडे यांनी हार्दिक अभिनंदन केले तसेच संस्थेचे प्रशासकीय अधिकारी डॉ. डी. बी. राऊत, प्रा. शिवदास विधाते, माऊली बोडखे, संजय शेंडे, सागर वाघुले, संदीप ननावरे व प्राचार्य अशोक गदादे यांनी या यशाबद्दल सर्व विद्यार्थ्यांचे तसेच या निकालात महत्वपूर्ण वाटा असलेल्या सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांचे हार्दीक अभिनंदन केले.

२० जून रोजी महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ अंतर्गत एप्रिल व मे महिन्यामध्ये झालेल्या परीक्षेचा निकाल लागला. या मध्ये द्वितीय वर्षात प्रथम शिंदे ऋषिकेश भास्कर ८१.९१ %, द्वितीय कु. वाघुले रुतुजा सुभाष ८०.७३ % व तृतीय कु. जाधव साक्षी विष्णू ८०.१८ % घेवून



प्राविण्य मिळवले. तसेच या वर्षी प्रथम वर्षात कु. लगड ऐश्वर्या शशिकांत ८२.५० %, द्वितीय सय्यद सानिया फकीर महमंद ७८.३० % व तृतीय गाढवे ऐश्वर्या विजू ७६.५० % घेऊन प्राविण्य मिळवले. या यशाचे मुळ कारण सांगताना प्राचार्य म्हणाले की, वेगवेगळया प्लॅटफॉर्म द्वारे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. शिक्षकांनी विद्यार्थ्यांकडे दिलेले वैयक्तीक लक्ष, शिक्षकांनी विद्यार्थ्यांसाठी नवीन अभ्यासक्रम प्रमाणे घेतलेले वेगवेगळे उपक्रम त्याचे व्हायवा, सराव परिक्षा, चाचणी परीक्षा, गेस्ट लेक्चर, एक्स्पर्ट लेक्चर, त्याच बरोबर फार्मसी काऊन्सिल ऑफ इंडिया यांनी ठरून दिलेल्या नियमानुसार कॉलेज मध्ये मेडीकल शॉप कॉलेज मध्ये बनवल्यामुळे विद्यार्थ्यांना फायदा झाला तसेच विद्यार्थ्यांसाठी असलेले वेगवेगळे मेंटोर्स यांनीही विद्यार्थ्यांना वैयक्तिक मार्गदर्शन केले. २०२४ - २५ मध्ये गंगाई फार्मसी कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी वेगवेगळे उपक्रम घेण्यात आले यामध्ये द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी क्वीझ कॉम्पिटिशन, सेमिनार, पोस्टर प्रेझेंटेशन, पेशंट काउंसलिंग, फार्माकोव्हीगीलन्स, इंडस्ट्री एक्सपर्ट लेक्चर, वेगवेगळ्या फिल्ड व्हीजीट मध्ये कोल्हापूर येथील औषध कंपनीला भेट, हास्पीटल व्हीजीट, कम्युनीटी फार्मसी व्हीजीट, मेडीसीन गार्डन भेट यामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास झाला. तसेच पि. सी. आय. नविन सिल्याबस नुसार कालेज मध्ये माडेल फार्मसी स्टोर ही उभारले आहे व या मध्ये विद्यार्थ्यांनी सर्व प्रात्यक्षिक ही केले. हे या घवघवीत निकालामागचे कारण आहे तसेच विद्यार्थ्यांना कॉलेजचे शिक्षक राहुल दानवे, अनिकेत डाके, साईनाथ पांढरे, काजल देवकर, ज्योती वैद्य, हर्षद नाकाडे, प्रतीक यादव, राऊत, विकास अनारसे, सुजीत अनारसे, पल्लवी बोडखे, सुप्रिया भडके, गणेश गांजूरे, संगिता राऊत, किशोर शिंदे यांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना लाभले असेही प्राचार्य यांनी सांगितले.

## सरपंच खेत्रे दहा हजाराची लाच घेताना घेतला ताब्यात

प्रतिनिधी । माजलगांव

महात्मा गांधी रोजगार योजना मधील वैयक्तिक लाभ जलसिंचन विहीर मंजूर करून लाभार्थी यादीत प्रस्ताव देण्यासाठी गावातील एका शेतकऱ्याकडून त्याचे आईचे नावचा प्रस्तावासाठी दहा हजार रुपयाची लाच घेताना तालुक्यातील कीट्टी आडगाव येथील सरपंच रुक्मानंद खेत्रे यास लाच लुचपत प्रतिबंधक विभागाच्या बीड येथील पथकाने शुक्रवारी दुपारी ३वा. च्या दरम्यान रंगेहाथ पकडल्याची घटना घडली.

येथील एका शेतकऱ्यास महात्मा गांधी रोजगार हमी योजना मधील सरकारी अनुदानावरील आपल्या आईच्या नावावर विहीर मिळावी यासाठी हा शेतकरी प्रयत्नशील होता.ती विहीर मी मिळवून देतो,गावच्या यादीत नाव टाकून मंजुरी यासाठी इंजिनिअर व मॅडम यांच्यासाठी प्रत्येकी दहा हजार रुपये असे एकूण २० हजार रुपयांची मागणी गावचे सरपंच रुखमानंद खेत्रे यांनी केली. परंतु ही बाब न पटल्याने सदरील शेतकऱ्याने बीड येथील लाच लुचपत विभाग यांच्याकडे तक्रार केली होती. विभागाने तक्रारीची पडताळणी करून शुक्रवारी दि.२० जुन रोजी दुपारी माजलगाव शहरातील गजानन नगर भागात सरपंच रुक्मानंद खेत्रे यांच्या राहत्या घरी सापळा रचला होता.यावेळी सदरील शेतकऱ्याकडून २० पैकी पहिला हप्ता म्हणून दहा हजार रुपयाची लाच घेताना सरपंच रुक्मानंद खेत्रे यांना रंगेहाथ पकडण्यात आले.या घटनेने एकच खळबळ उडाली.ही कारवाई बीड येथील पथकाचे निरीक्षक राहुल कुमार भोज,समाधान कबडे,उपनिरीक्षक सुरेश सांगळे,मच्छिंद्र बिडकर, पांडुरंग काचगुंडे,अमोल खरमाळे,संतोष राठोड प्रदीप सुरवसे,अविनाश गवळी,राहुल शेळके,अंबादास पुरी यांनी कारवाई केली.

## वाघी बोबडे येथील सामूहिक योग उत्सव कार्यक्रमास प्रतिसाद

प्रतिनिधी । जिंतुर

बोरी- येथून जवळच असलेल्या वाघी बोबडे येथील आयुष्मान आरोग्य मंदिराच्या वतीने जिल्हा आरोग्य अधिकारी श्री पांचाळ, जिल्हा आयुष अधिकारी डॉ. वडमिलवार, तालुका आरोग्य अधिकारी श्री बोराळकर यांच्या मार्गदर्शनाखाली दरवर्षीप्रमाणे याही वर्षी आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त २१ जून रोजी सकाळी सामूहिक योग कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वैद्यकीय अधिकारी डॉ. अनंत दहिवाल होते. योग मार्गदर्शनाचा शुभारंभ प्रभुकृपा विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रा.संतोष साखरे यांच्या हस्ते झाला.

सकाळी योग जनजागरण फेरी काढण्यात आली. यानंतर प्रभूकृपा विद्यालयाच्या प्रांगणात योग मार्गदर्शन या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. योग प्रशिक्षक गजानन चौधरी व ब्रह्माकुमारी कल्पना दिदी यांनी



आयुष्मान आरोग्य मंदिराचा उपक्रम
योग्य प्रशिक्षक गजानन चौधरी यांचे मार्गदर्शन

प्राणायाम, योगासने यांचे प्रात्यक्षिकासह माहिती सांगितली. यावेळी विद्यार्थी, शिक्षक व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### पोलिसाला जीवे मारण्याचा प्रयत्न केल्या प्रकरणातील

## आरोपीला अटकपूर्व जामीन मंजूर

प्रतिनिधी । जिंतुर

जिंतूर. सरकारी कामात अडथळा आणून पोलीस कर्मचाऱ्यास जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी जिंतूर पोलीस ठाण्यात अक्षय सूर्यवंशी आणि राधे यांच्याविरुद्ध दि. २७ मे रोजी गुन्हा दाखल झाला होता. गुन्हा दाखल झाल्यावर अटकेपासून संरक्षण मिळवण्यासाठी, अक्षय सूर्यवंशी याने २८ मे रोजी ड. सुनिल बुधवंत यांच्यामार्फत परभणी जिल्हा व सत्र न्यायालयात अटकपूर्व जामिनासाठी अर्ज केला.

सुनावणीदरम्यान ड. बुधवंत यांनी युक्तिवाद केला की, अर्जदाराने गुन्हा केलेला नसून त्याला खोट्या रीतीने गोवण्यात आले आहे. भारतीय न्याय संहितेचे कलम १०९ हेतुपुरस्सर लावण्यात आले असून, फिर्यादी पोलीस कर्मचाऱ्यास गंभीर दुखापत झालेली नाही. अर्जदार प्रतिष्ठित नागरिक असून तपासाला सहकार्य करण्यास तयार आहे, त्यामुळे जामीन मंजूर करावा.

विरोधात, सहाय्यक सरकारी वकिलांनी सांगितले की, आरोपीने गंभीर गुन्हा केला असून, तो फरार आहे. तो एका राजकीय पक्षाचा पदाधिकारी असून त्याच्यावर प्रलंबित गुन्हे असल्याने जामीन फेटाळावा. त्यावर ड. बुधवंत यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या 'प्रभाकर तिवारी विरुद्ध उत्तर प्रदेश' प्रकरणाचा दाखला देत, काही गुन्हे प्रलंबित असणे हा जामीन नाकारण्याचा आधार होऊ शकत नाही, असे निरीक्षण सादर केले.दोन्ही बाजू ऐकून, न्यायालयाने प्रत्यक्ष कोठडीची आवश्यकता नसल्याचे नमूद करत, केवळ प्रलंबित गुन्ह्यांमुळे स्वातंत्र्यावर बंधन घालता येणार नाही, असे सांगून अक्षय सूर्यवंशीला दि. १९ जून रोजी अटकपूर्व जामीन मंजूर केला.

## राष्ट्रीय महामार्गाच्या मंजुरीचे श्रेय घेणा-या पुढा-यांनी निकृष्ट दर्जाच्या रखडलेल्या गतवर्षी ४५९ तर

### यावर्षी ५ महिन्यांत १५७ अपघातात बळी गेलेल्यांची जबाबदारी घ्यावी :- डॉ.गणेश ढवळे

प्रतिनिधी । बीड

भारत सरकारच्या रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयाने केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितिन गडकरी यांच्या आदेशानुसार २०२५-२६ च्या वार्षिक आराखड्यात बीड जिल्ह्यातील लातुर ते लोखंडी सावरगाव दरम्यान बर्दापुर फाटा ते लोखंडी सावरगाव १८ किलोमीटर रस्त्यावरील उर्वरित लांबीचे चौपदीकरण आणि माजलगाव ते केज दरम्यान धारूर जवळच्या ब्लॅक स्पॉट ठरलेल्या घाट या दोन टप्प्यांसाठी ४२१ कोटी रूपयांची कामे मंजूर करण्यात आली आहेत. आम्हीच कामे केंद्रीय मंत्री नितिनजी गडकरी यांच्या कडुन मंजूर करून आणली म्हणत नितिनजी गडकरी यांचे आभार मानत माजी खासदार प्रितमताई मुंडे व विद्यमान खासदार बजरंग बप्पा सोनावणे यांची श्रेयवादासाठी दैनिकात पत्रकबाजी सुरू आहे. मात्र याचवेळी गेल्या वर्षी २०२४ मध्ये अपघातात ४५९ जणांनी आपला जीव गमावला तर ३९७ जण गंभीर जखमी झाले होते. तर जानेवारी २०२५ ते मे २०२५ या गेल्या ५ महिन्यात २५९



अपघातात १५७ जण मृत्युमुखी पडले असून व १०२ जण गंभीर जखमी झाल्याची शासन दरबारी नोंद आहे. निकृष्ट रस्ते, गुळगुळीत रस्त्यावरील गतिरोधकांचा अभाव, दिशादर्शक फलक नसणे आणि रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत जनजागृतीच्या नावाखाली फोटो सेशन यामुळे अपघातांचे प्रमाण वाढलेले आहे.जिल्ह्यातील महामार्गावर ४० ब्लॅंक स्पॉट आहेत.याबाबतीत मात्र केवळ सामाजिक कार्यकर्ते यांनीच वारंवार प्रशासन व सरकारला निवेदन,आंदोलनाद्वारे जागे करण्याचा प्रयत्न केला असुन आज श्रेयवादासाठी धडपडणारे लोकप्रतिनिधी मुग गिळून गप्प होते त्यामुळे या अपघातांची जबाबदारी सुद्धा त्यांनी घ्यायला हवी अशी संतप्त प्रतिक्रिया सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी दिली आहे.

एखाद्या ठिकाणी वारंवार होणारे अपघात लक्षात ठेवुन तेथील रस्त्याची स्थिती आणि अपघाताचे कारण शोधून उपाययोजना केल्या जातात.या जीवघेण्या अपघात प्रवण स्थळांना ब्लॅंक पोट म्हणून निश्चित केले जाते. बीड जिल्ह्यात महामार्गावर ४० ब्लॅंक स्पॉट ठरविण्यात आली आहेत. ती पुढीलप्रमाणे सिरसाळा ,नित्रुड, नंदगाव डेअरी सायगाव ता.आंबेजोगाई )धारूर घाट, होळेश्वर विद्यालय, एचपी पेट्रोलपंप ते चंदनसावरगाव, सुडी पार्टी ते मांगवडगाव, लोखंडी सावरगाव, धामणगाव, वाघळूज, साबलखेड, पांढरी, पोखरी, चुंबळी फाटा, बामदळवाडी ,मांजरसुंबा घाट, मंझेरी रोड ,पाली , छत्रपती संभाजी महाराज चौक, पाडाशिंगी ब्रिज ,रांजणी ,गढी पूल ,वडगाव ढोक, नायरा पंप गेवराई, बागपिंपळगाव ,नागझरी सिरसदेवी शिवार, मादळमोही पेट्रोलपंप, सावरगाव, पांगर बावडी याठिकाणांचा समावेश आहे.

# शिक्षण विस्तार अधिकारी श्रीम.सुनिता उगले-तरटे यांचा सेवापूर्ती सोहळा संपन्न

आष्टी (प्रतिनिधी)

सहशिक्षिका, प्राथमिक पदविधर शिक्षिका, केंद्रप्रमुख व शिक्षण विस्तार अधिकारी आदि विविध पदावर शिक्षण क्षेत्रात ३९ वर्षे ६ महिने सेवा बजावून श्रीमती सुनिता उगले - तरटे या नियत वयोमानानुसार शासकीय सेवेतून सेवानिवृत झाल्या. सेवापूर्ती कार्यक्रम आष्टी येथील मोरेश्वर लॉन्समध्ये झाला. सुरुवातीला दीपप्रज्वलन व राजमाता मासाहेब जिजाऊ व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमा पूजनाने झाली. मंचावर श्रीमती सुनिता उगले यांचे मातापिता सौ. सुमन व श्री दादाहरी उगले यांचा सत्कार झाला.

प्रास्ताविकात जामगाव शाळेचे मुख्याध्यापक नंदकिशोर होगाडे यांनी संपूर्ण सेवा कालातील प्रवास व केलेले उल्लेखनीय कार्य सांगितले. आपल्या प्रदीर्घ सेवाकालात प्रामाणिकपणाने, निष्ठेने, जबाबदारीने व एक संधी म्हणून काम केल्यास कर्तव्यपूर्तीच समाधान मिळते. त्यांचे अनेक विद्यार्थी उच्च पदावर काम करत आहेत. याप्रसंगी अनेक विद्यार्थी उपस्थित होते. पर्यवेक्षिय कार्यकाळात शिक्षकांना प्रेरणा देणा-या व शैक्षणिक गुणवत्तावाढीसाठी स्पर्धा परिक्षेवर भर देवून काम करुन घेणाऱ्या म्हणून श्रीम. सुनिता उगले मडमचा कार्यकाल उल्लेखनिय आहे. अशा शिक्षिका, केंद्रप्रमुख, शिक्षण विस्तार अधिकारी श्रीम. सुनिता उगले यांच्या सेवापूर्ती सोहळ्या निमित्ताने गौरवोद्गार आ. सुरेश धस, माजी आ. साहेबराव दरेकर



यांनी व्यक्त केले. याप्रसंगी शरद जरे, डा. भास्कर पोटघन, महादेव काठमोरे, मारुती पठाडे, श्रीम. लतिका तरटे यांनी आपल्या मनोगतात श्रीम. सुनिता उगले यांच्या उल्लेखनीय कार्याविषयी, कौटुंबिक व सामाजिक कामाविषयी गौरवोद्गार काढले. श्रीम. सुनिता उगले यांनी सर्वांचे ऋणनिर्देश व्यक्त केले.

सर्वांच्या सहकायाने चांगले शैक्षणिक कार्य करता आले. प्रत्येक काम संधी म्हणून सकारात्मक विचाराने पार पाडले. नोकरीच्या कालावधीतील हा प्रवास केवळ जबाबदारीने केला तर एक सुंदर आठवण म्हणून कायम स्मरणात राहील. यापुढेही आपले स्नेह, प्रेम आणि मार्गदर्शन लाभत राहो ही अपेक्षा व्यक्त केली. या कार्यक्रमाला आई - वडील सौ. सुमन व दादाहरी उगले, आ. सुरेश धस, माजी आ. साहेबराव देरेकर, सहनिबंधक सहकारी संस्था छत्रपती संभाजीनगर शरद जरे, साताराचे माजी शिक्षणाधिकारी डा. भास्कर पोटघन, महानंदा दुध महासंघाच्या संचालिका सौ. प्राजक्ताताई धस, नगराध्यक्षा सौ. दिपाली जाधव (पाटोदा), गटशिक्षणाधिकारी सौ. सिमा काळे, जे. शि. वि. अधिकारी मनोरंजन धस, महादेव काठमोरे, विवेकानंद पतसंस्थेचे चेअरमन मारुती पठाडे, महेश शिंदे, अशोक लटपटे, माजी चेअरमन सुरेश पवार, माजी नगराध्यक्ष रंगनाथ धोंडे, गवारे साहेब (यवतमाळ), तावरे साहेब, संपत धोंडे, पी .वाय. काळे, गोरक्षनाथ सायकड, राजेंद्र लाड, कोल्हे साहेब निवृत्त तहसीलदार, दाजी - जाधव सर, नामदेव कोरडे, बहीण - श्रीम. जाधव मॅडम, श्रीम कोरडे मॅडम, भाऊ - संतोष उगले, वहिनी - पुष्पा उगले, जावई - डॉक्टर विकास भास्कर पोटघन, पतसंस्थेचे सर्व संचालक, राजे छत्रपती संभाजी कॉलनीतील सर्व रहिवासी, गटशिक्षण अधिकारी कार्यालयाचे सर्व कर्मचारी, सर्व केंद्रप्रमुख, सर्व मुख्याध्यापक, तालुक्यातील शिक्षक - शिक्षिका, नातेवाईक उपस्थित होते. यावेळी उपस्थितांचे माजी विद्यार्थिनी डॉ. प्रियंका पोटघन यांनी आभार मानले तर सेवापूर्ती सोहळ्याचे बहारदार सुत्रसंचलन आदर्श शिक्षक बाळासाहेब तळेकर यांनी केले. शेवटी सर्वांनी सुरुची भोजनाचा आस्वाद घेतला.

## आष्टी येथे मा.आ.भीमराव धोंडे साहेब यांच्या उपस्थितीत योग दिन साजरा



आष्टी (प्रतिनिधी)

शिक्षणमहर्षी माजी आ. भीमराव धोंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत जागतिक योग दिन आनंद शैक्षणिक संकुल आष्टी येथील कृषी महाविद्यालयाच्या मैदानात शनिवार दि. २१ जून २०२५ रोजी सकाळी ७ वा. संपन्न झाला. योग शिबिराची सुरुवात महर्षी पतंजली यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. योग गुरू प्रा. भा. दे. जगताप सर यांनी उपस्थितांना अनेक प्रकारचे आसने करून दाखवली व त्याच बरोबर उपस्थितीतांकडून ती करून घेतली.याप्रसंगी मार्गदर्शन करतांना माजी आ. भीमराव धोंडे म्हणाले की, देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०१५ मध्ये जागतिक योग दिन हा उपक्रम राबविण्याचा निर्णय घेतला. भारतातच नव्हे तर जगभरात हा दिवस मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. आरोग्य ही सर्वात मोठी धनसंपदा आहे त्यामुळे सर्वांनी योग व व्यायाम हा दररोज करावा.

यावेळी कार्यकर्ते व आनंद शैक्षणिक संकुलातील सर्व कॉलेजचे प्राचार्य, प्राध्यापक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यापीठ निर्देशाप्रमाणे मागील आठवड्यात कृषी महाविद्यालयांमध्ये आनंद शैक्षणिक संकुल आष्टी मधील महाविद्यालयाच्या विद्यार्थी व विद्यार्थिनी करिता योग प्रशिक्षण शिबिराचे आयोजन केले होते. या शिबिराकरिता योग प्रशिक्षक म्हणून प्रा. राजाभाऊ ढोबळे शारीरिक शिक्षण महाविद्यालय आष्टी यांनी उत्कृष्ट काम पाहिले.

## भारतीय स्टेट बँक दिनानिमित्त मंगळवारी एसबीआय वडवणी शाखेच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन

### ग्राहक, शेतकरी,नागरिक, कर्मचारी व व्यापारी बांधवांना रक्तदान करण्याचे आवाहन

वडवणी :- प्रतिनिधी

प्रतिवर्षी प्रमाणे यावर्षी ही १ जुलै हा बँक दिन म्हणून सर्व भारतामध्ये मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येत असतो. यानिमित्ताने देशभरात बँक प्रशासन व कर्मचाऱ्यांच्या वतीने विविध सामाजिक व आर्थिक व सांस्कृतिक उपक्रम राबविले जातात. स्टेट बँक ऑफ इंडिया वडवणी येथे देखील प्रतिवर्षी बँक दिवस हा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येतो. याचनिमित्ताने या वर्षीदेखील विविध उपक्रम राबवून बँक दिन साजरा करणार असल्याचे वडवणी येथील शाखेचे व्यवस्थापक यांनी आमच्या प्रतिनिधींशी बोलताना सांगितले.

याबद्दल सविस्तर माहिती अशी की, १ जुलै हा दिन राष्ट्रीय बँक दिन म्हणून सर्वत्र साजरा करण्यात येत असतो याच अनुषंगाने स्टेट बँक ऑफ इंडिया वडवणी शाखेच्या वतीने भव्य असे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे रक्तदान शिबीर दि.२४ जून वार मंगळवार रोजी वडवणी येथील एसबीआय शाखेमध्ये संपन्न होणार आहे. रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान असून देशातील नागरिकांनी आपले स्वास्थ्य उत्तम ठेवण्यासाठी नेहमित व्यायामबरोबर रक्तदान करणे आवश्यक आहे. या रक्तदान शिबिराला तालुक्यातील ग्राहक, शेतकरी, नागरिक, कर्मचारी व व्यापारी बांधवांना रक्तदान करण्याचे आवाहन बँकेचे व्यवस्थापक यांनी केले आहे.

## शिरूर येथे शांतीब्रम्ह संत एकनाथ महाराजांच्या पालखीचे उत्साहात स्वागत

### पालखीच्या स्वागताला ग्रामस्थांचे उधान- फराळ आणि फळांचे स्टॉल- घरोघरी वारकऱ्यांना फराळ

मानूर (प्रतिनिधी)

शांतीब्रम्ह संत एकनाथ महाराजांच्या पालखीचे सालाबाद प्रमाणे याही वर्षी शिरूरकरांनी उत्साहात आणि भव्य स्वरूपात स्वागत केले.नगर जिल्ह्यातील मुंगुसवाडे येथील मुक्काम केल्यानंतर संत एकनाथ महाराजांच्या पालखीचे बीड जिल्ह्याच्या सीमेवर आगमन झाले.दहिवंडी येथील ग्रामस्थांनी स्वागत करून पालखीला वाट लावल्यानंतर शिरूरकर मोठ्या संख्येने स्वागताला उभे होते.शहराच्या हद्दीत प्रवेश केल्यानंतर प्रथम नगराध्यक्ष रोहिदास पाटील गाडेकर यांनी संत एकनाथ महाराजांच्या पादुका आणि पालखी प्रमुख गोसावी महाराज यांना पुष्पहार घालून नगरीच्या वतीने स्वागत केले.त्यानंतर ग्रामस्थांनी पालखीला खांदा देऊन परंपरेप्रमाणे पालखी वाजत गाजत मारुती मंदिरात भाविकांच्या दर्शनासाठी ठेवण्यात आली.या वेळी शहरातील आबालवृद्धांसह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी दर्शन घेतले.

मुस्लिम बांधवांनी केली फराळाची व्यवस्था

शिरूर शहरातील फळविक्रेते जमीर आणि समीर बागवान यांनी दिंडीतील भाविकांना फराळाची व्यवस्था केली होती. वारकऱ्यांना फराळ वाटप करताना राष्ट्रवादी युवक काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष महेबूब भाई शेख व अनेक मान्यवर




या वेळी दिंडीतील उपस्थित भाविकांना जवळपास दिड क्विंटल साबुदाणा खिचडी आणि केळीचे वाटप करण्यात आले.

आरोग्य विभागाच्या वतीने आरोग्य सेवा

प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वतीने दिंडीतील भाविकांची आरोग्य तपासणी करण्यात आली.या वेळी १४२ भाविकांची आरोग्य तपासणी करून त्यांना औषध,गोळ्यांचे वाटप करण्यात आले. वैद्यकीय अधिकारी डॉ.पूजा मस्के यांच्यासह मृणाली घुगे,समुदाय आरोग्य अधिकारी प्रविण भोंडवे,तालुका आरोग्य निरीक्षक व्ही.आर.लातूरकर,आरोग्य सहाय्यक बाबुराव जाधव,अमोल पाटील,महेश बडे,निशिकांत खाडे,आरोग्यसेविका कल्पना माने,अश्विनी सारूक,राजश्री डमाळे वाहनचालक प्रकाश सुळ यांची या वेळी उपस्थिती होती.

रोकडे परिवाराची पायघड्यांची परंपरा कायम

संत एकनाथ महाराजांच्या पालखीचे आगमन झाल्यानंतर शहरातील रोकडे परिवाराच्या वतीने पायघड्या घालण्याची परंपरा आजही कायम आहे.बाळाजी रोकडे यांच्यानंतर स्वर्गीय धोंडीराम रोकडे आणि त्यांचा मुलगा रमेश याने आपली पुढची पिढी सचिन रोकडे यांच्याकडे हि पिढीकडे सोपविली आहे.

## सावध व्हा - बांबू लागवडीच्या व्यापक चळवळीची गरज - कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा भाई पटेल

गेवराई / प्रतिनिधी

पर्यावरणाचा समतोल बिघडत चालला आहे. वातावरणात कार्बनचे प्रमाण वाढल्याने, मानवा पुढे भविष्यात अडचणी उभ्या राहतील. हे टाळायचे असेल तर, वेगाने वाढणाऱ्या झाडांचे संवर्धन करण्याची गरज आहे. बांबु लागवडीच्या माध्यमातून ग्रीन बेल्ट तयार करून, या चळवळीला तरूण शेतकर्यांनी व्यापक स्वरूप प्राप्त करून द्यावे. असे, आवाहन कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष, माजी आमदार पाशा भाई पटेल यांनी येथे पत्रकारांशी बोलताना केले आहे. दरम्यान, बीड जिल्ह्याला मोठा गोदा काठ लाभलेला असून, त्या पट्ट्यात बांबू लागवडीला मोठी संधी असल्याचे निरिक्षण ही त्यांनी नांदविले आहे. सामाजिक कार्यकर्ते तथा जय भवानी बॅन्केचे व्हा. चेअरमन स्व. बालाप्रसाद लोया यांच्या निवासस्थानी, कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल यांनी, शनिवार ता. २१ रोजी सकाळी अकरा वाजता सांत्वनपर भेट दिली. बालाभाऊ लोया यांनी शेतकरी आंदोलनाच्या चळवळीत माझ्या सोबत काम केले. समाजा विषयी कळवळा असलेला एक सहकारी गेल्याचे सांगून, त्यांनी आठवणींना उजाळा दिला. त्यानंतर, पाशा पटेल यांनी पत्रकारांशी संवाद साधून, बांबू शेती लागवडीच्या लागवडीच्या संदर्भात भाष्य केले. वातावरणात प्रतिकूल बदल होऊ लागलेत.



त्याचे दुष्परिणाम लोकांच्या आरोग्यावर होत आहेत. कार्बनच्या वाढत्या प्रमाणामुळे ऑक्सिजनच अडचणीत आला आहे. ही चिंतेची बाब असून, नव्या पिढीच्या भविष्यासाठी झाडांचे संवर्धन आवश्यक आहे. बांबू शेती हा अंत्यत महत्त्वाचा आणि शेतकर्यांच्या हिताचा विषय आहे. बांबूची शेती करण्यासाठी सरकार मदत करायला तयार आहे. शेतकरी बांबू शेती कडे वळला पाहिजे. त्यातून,

शेतकर्यांना आर्थिक सुबत्ता येईल आणि पर्यावरण संवर्धन करता येईल. त्यासाठी, बांबू शेतीच्या लागवडीची आवश्यकता आहे. बीड जिल्ह्यात मोठा गोदा काठ आहे. या परिसरात बांबू शेतीला चांगली संधी आहे. बांबू पासून अत्यावश्यक गोष्टी तयार होतात. इथेनॉल, कपडे, इ. वस्तू बांबू पासून तयार करता येतील आणि कार्बनचे प्रमाण ही कमी होईल. दरम्यान, पर्यावरणाचा समतोल बिघडत चालला आहे. वातावरणात कार्बनचे प्रमाण वाढल्याने, मानवा पुढे भविष्यात अडचणी उभ्या राहतील. हे टाळायचे असेल तर, वेगाने वाढणाऱ्या झाडांचे संवर्धन करण्याची गरज आहे. बांबु लागवडीच्या माध्यमातून ग्रीन बेल्ट तयार व्हावा, यासाठी प्रयत्न सुरू आहेत. या चळवळीला तरूण शेतकर्यांनी व्यापक स्वरूप प्राप्त करून द्यावे. असे, आवाहन कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष, माजी आमदार पाशा भाई पटेल यांनी शेवटी बोलताना केले आहे.

## आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा

### रायपूर येथील चिमुकल्याणी केला योग दिन साजरा




गंगापूर / प्रतिनिधी

जि प प्राथमिक शाळा रायपूर येथे २१ जून हा आंतरराष्ट्रीय योगा दिन उत्साहात साजरा करण्यात आला यावेळी विद्यालयातील शिक्षक श्रीएस. जे, आहेर यांनी विद्यार्थ्यांना योगा करण्याचे फायदे समजावून सांगितले तसेच योगासनाचे विविध प्रकार प्रत्यक्ष करून दाखवले यावेळी विद्यालयातील प्रशासकीय अधिकारी शिक्षक श्री आर जे देवरे श्री ए आर डोणगावकर श्री राजेश आढाव श्रीमती एस,पी उदगीरकर श्रीमती एस पी टाकळकर व श्रीमती जे पी पाटील यांनी प्रयत्न केले.या शिक्षकांनी व सर्व विद्यार्थ्यांनी योगा दिनाच्या निमित्ताने विविध योगासने मोठ्या उत्साहाने करून दाखवली, यावेळी शिक्षक पालक, गावकरी उपस्थित होते.



**चिमुकल्यांचाही योगदिन**

**अंबाजोगाई –भा.शि.प्र.संस्था संचलित खोलेश्वरच्या प्रगती विभाग शिशु वाटिकेत चिमुकल्यांनीही योग दिन साजरा केला. शिशु गटातील चिमुकल्यांनी विविध शारीरिक सुक्ष्म व्यायाम, प्राणायाम प्रात्यक्षिक याचे धडे देण्यात आले. त्याचे चिमुकल्यांनी आनंदाने सादरीकरण केले.यावेळी मुख्याध्यापक शिवाजीराव हेंडगे, विभाग प्रमुख वर्षा मुंडे , शिशु वाटिका प्रमुख कल्याणी देशपांडे, बालवाडी ताई मनीषा पोतदार आदी उपस्थित होते.**

## राजमाता जिजाऊ महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिन

किल्लेधारूर/प्रतिनिधी

येथील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे राजमाता जिजाऊ महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय छात्र सेना व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने २१ जून रोजी जागतिक योग दिनानिमित्त महाविद्यालयातील इंग्रजी विभाग प्रमुख प्राध्यापक डॉ. बालाजी नवले यांनी योगाचे विविध प्रकार व महत्त्व हे प्रात्यक्षिकाद्वारे समजावून दिले. नियमित योगासने केल्याने शारीरिक तंदुरुस्ती व आरोग्य उत्तम राहण्यास मदत होते. स्नायूंचे विविध आजारांवर मात करता येते असे सांगितले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे यांनी योग दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमाच्या माध्यमातून निरोगी शरीरासाठी योग साधना कशी उपयुक्त ठरू शकते हे सांगून सर्वांनी योग नियमितपणे करावा असे उपस्थितांना आवाहन केले. आयोजित कार्यक्रमांमध्ये उपप्राचार्य मेजर डॉ. मिलिंद गायकवाड, उपप्राचार्य प्रा. महादेव जोगडे, प्रा. सच्चिदानंद ढेपे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. डी. बी. जाधव, डॉ. विजयकुमार कुंभारे, प्रा. बालासाहेब जोगदंड, आयक्यूएसी समन्वयक डॉ. एल. बी. जाधवर, कार्यालय अधीक्षक श्री. वायाळ सर, धारुर तालुक्याचे क्रीडा संयोजक तथा आदर्श क्रीडा शिक्षक लहू कुमार गव्हाणे यांबरोबरच महाविद्यालयातील सर्व



प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी, एनसीसी कॅडेट्स, राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक व विद्यार्थ्यांचे उपस्थिती मोठ्या संख्येने होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार उपप्राचार्य मेजर डॉ. मिलिंद गायकवाड यांनी केले.

# आष्टीच्या डी.फार्मसी कॉलेजच्या विद्यार्थ्यांचे घवघवीत यश

## कु.कट्टरनवरे श्रद्धा मोहन ८६.८०%,कु.शिंदे तेजल भाऊसाहेब ८५.८२% घेवून मिळवला प्रथम क्रमांक



आष्टी (प्रतिनिधी)

संस्थापक अध्यक्ष मा. आ. भीमरावजी धोंडे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली २००६ साली स्थापन झालेले आनंद चॅरिटेबल संस्था संचलित कॉलेज ऑफ फार्मासुटिकल सायन्स रिसर्च (डी फार्मसी, बी फार्मसी, एम फार्मसी) आष्टी या औषध निर्माण शास्त्र कॉलेजचा डी. फार्मसी शाखेचा महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ मुंबई बोर्डाने उन्हाळी २०२५ परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर केला असून या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादित केले. प्रथम व द्वितीय वर्ष डी. फार्मसी चा ९७ टक्के निकाल लागला असून प्रथम वर्ष डी. फार्मसीमध्ये प्रथम क्रमांक कु. कट्टरनवरे श्रद्धा मोहन ८६.८०%, द्वितीय क्रमांक कु. कांबळे मानसी सुनील ८६.१०%, तृतीय क्रमांक कु. शिंदे निकिता किसन ८५.९०%, चतुर्थ क्रमांक गंभीरे धनश्री हनुमान ८५.६०%, पाचवा क्रमांक कु. गीते कल्पना अजिनाथ ८४.७०% तसेच द्वितीय वर्षामध्ये प्रथम क्रमांक कु. शिंदे तेजल भाऊसाहेब ८५.८२%, द्वितीय क्रमांक कु. गर्जे पूनम बाळासाहेब ८५.२७%, तृतीय क्रमांक कोकणे अंजली संजय ८४.६४%, चतुर्थ क्रमांक झगडे शुभांगी मारुती ८३.९७%, पाचवा क्रमांक कु. धनवडे वैष्णवी अनिल ८३.८८% या सर्वांनी उत्कृष्ट असे गुण मिळवून यश संपादन केले आहे.

घवघवीत यश संपादन केलेल्या व उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थी - विद्यार्थिनींचे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मा. आ. भीमरावजी धोंडे, सहसचिव डॉ. अजयदादा धोंडे, संचालक अभयराजे धोंडे, प्रशासन अधिकारी डॉ. डी. बी. राऊत, शिवदास विधाते, माऊली बोडखे, संजय शेंडे, सागर वाघुले, संदीप नन्नवरे या सर्वांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

या कॉलेजमधील विद्यार्थी दरवर्षी याप्रमाणे यश संपादित करतात या कॉलेजमध्ये नियमित होणारे सर्व वर्ग तासिका प्रात्यक्षिक, उत्कृष्ट ग्रंथालय, कॉम्प्युटर रूम, निसर्गरम्य परिसर, वेगवेगळ्या विषयांमधील वेगवेगळ्या ठिकाणचे विभागातील तज्ञ प्राध्यापकांचे व्याख्यानाद्वारे मार्गदर्शन, वेगवेगळ्या औषध निर्माण कंपनीला भेटी, विद्यार्थ्यांना औषधांमध्ये संशोधन करण्यासाठी मार्गदर्शन करणे, विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी प्रोत्साहित करण्यासाठी कॉलेजमध्ये होत असलेले विविध कार्यक्रम, स्नेहसंमेलन, संशोधन प्रेझेंटेशन, शिक्षक पालक मेळावा, औषध निर्माण कंपनीचा कॅम्पस इंटरव्यू रोजगार मिळावा, आयुर्वेदिक वनस्पतींचा अभ्यास करण्यासाठी विद्यार्थ्यांची वेगवेगळ्या औषधी वनस्पती गार्डना भेटीचे नियोजन, विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक गोष्टीचा अभ्यास होण्यासाठी विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या सामाजिक कार्यशाळेंना भेटी देणे, शासकीय तसेच खाजगी हॉस्पिटल मध्ये विद्यार्थ्यांना प्रॅक्टिस साठी पाठवणे, पेशंटशी संवाद साधून त्या मार्फत वेगवेगळ्या पद्धतीने अभ्यास करणे, वस्तीगृहामध्ये असलेले अभ्यासिका कक्ष या सर्व बाबी या कॉलेजमध्ये आहेत व होतात त्यामुळे दरवर्षी उत्कृष्ट असा कॉलेजचा निकाल लागतो असे कॉलेजचे प्राचार्य डॉ. सुनील कोल्हे यांनी सांगितले.

# जिल्हा परिषद उच्च प्राथमिकशाळा तरनळी शाळेत राजमाता जिजाऊ माँसाहेब यांची पुण्यतिथी साजरी

केज/प्रतिनिधी

जिल्हा परिषद उच्च प्राथमिकशाळा तरनळी केंद्र लव्हुरी ता.केज या शाळेत राजमाता जिजाऊ माँसाहेब यांच्या प्रतिमेस दि.१७ जुन २०२५ मंगळवार रोजी आदर्श शिक्षिका श्रीमती गिताताई जीवराज अंडील मॅडम यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले व पुण्यतिथी साजरी केली.छत्रपती शिवाजी महाराज यांचा दि.६ जुन १६७४ रोजी शिवस्वराज्याभिषेक झाला व अत्यंत अल्पावधीतच दि.१७ जुन १६७४ रोजी राजमाता जिजाऊ माँसाहेब यांचे देहावसान झाले.असे आपल्या प्रास्ताविकात जिल्हा परिषद उच्च प्राथमिकशाळा तरनळी शाळेचे मुख्याध्यापक श्री.राजाभाऊ दत्तात्रय कदम यांनी सांगितले. आदर्श शिक्षिका श्रीमती गिताताई जीवराज अंडील मॅडम यांनी राजमाता जिजाऊ माँसाहेब यांच्या पुण्यतिथी निमित्त त्यांच्या कार्याबाबत सविस्तर माहिती दिली. श्रीमती सोनाली भारतराव भुमकर मॅडम,श्री.बाळासाहेब भिल्लु राठोड सर,श्री. भारत बाबुराव हांगे सर, बाबासाहेब राजाराम मैंद सर यांनी आपले मनोगत व्यक्त केले.या वेळी २०२४ - २०२५ या शैक्षणिक वर्षातील राजर्षी शाहू महाराज सामाजिक संस्था खोंदला ता.कळंब संस्थेच्या मी ज्ञानी होणार या उपक्रमात सहभागी होऊन १) श्रध्दा संपत्ती सरवदे,२) प्रियंका अशोक देटे,३) भाग्यश्री ओमप्रकाश मोहिते यांनी क्रमांक मिळविला.त्यांना संस्थेने



संस्थेचे दिलेले प्रमाणपत्र,ट्रॉफी व शाळेस सहभाग प्रमाणपत्र देण्यात आले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री.भारत बाबुराव हांगे सर यांनी केले.शेवटी श्रीमती सोनाली भारतराव भुमकर मॅडम यांनी आभार मानले.या कार्यक्रमास ज्येष्ठ नागरिक राधा आक्का खामकर,विद्यार्थी, विद्यार्थिनी,पिएम पोषण शक्ती निर्माण योजनाचे कामगार श्री. गणेश काशिनाथ माने, शिक्षक,शिक्षिका, गावकरी उपस्थित होते.

# आ.सुरेश धस यांच्या हस्ते यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार



आष्टी (प्रतिनिधी)

आष्टी मतदारसंघातील शैक्षणिक व विविध क्षेत्रांत आपल्या कर्तुत्वाच्या जोरावर जिद्द आणि चिकाटी दाखवत भरारी घेऊन यश संपादन करत आपापल्या क्षेत्रात यशस्वी झालेल्या विद्यार्थी व पालक यांचा आमदार सुरेश धस यांनी आष्टी येथे अद्वेतचंद्र निवासस्थानी सत्कार करत अभिनंदन केले.

यामध्ये आष्टी तालुक्यातील म्हसोबावाडी येथील विशाल शेकडे या युवकाची आर्मी लेफ्टनंट या पदी नियुक्ती झाली. पाटसरा येथील राहुल ज्ञानदेव सांगळे यांची बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये दुय्यम अभियंता या पदावर नियुक्ती झाले. शिरूर तालुक्यातील वारणी येथील जयेश सुभाष केदार याला (५४७ गुण), संकेत सोमनाथ केदार (५२४ गुण), प्रमोद सुरेश डोंगरे (५२० गुण) या विद्यार्थ्यांनी छएएढ परीक्षेत यश संपादन करून ते चइइड साठी पात्र झालेल्या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचा आष्टी मतदारसंघाचे आ. सुरेश धस यांनी सत्कार करून अभिनंदन केले. त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.यावेळी सभापती रमजान तांबोळी, सभापती बाळासाहेब केदार, एन. टी. गर्जे भाऊ, चेअरमन आदिनाथ सानप, रंगनाथ धोंडे, बाळू शेठ मेहेर, रामशेठ मधूरकर, आत्माराम फुंदे, प्रशांत गर्जे, राहुल गर्जे यांच्यासह पालक, नागरिक आदी उपस्थित होते.

# श्री वैद्यनाथ विद्यालय परळीच्या २५ वर्षापूर्वीच्या दहावीच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमिलन मेळावा उत्साहात संपन्न

## स्नेहमेळाव्यात जुन्या आठवणींना उजाळा, माजी शिक्षकांचा भावनिक सन्मान

परळी (प्रतिनिधी)

श्री वैद्यनाथ विद्यालय, परळी येथील सन २००० सालच्या दहावीच्या विद्यार्थ्यांनी २५ वर्षांनंतर एकत्र येत स्नेहमेळावा आयोजित केला. आज रविवार, दिनांक २२ जून २०२५ रोजी श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिराच्या सभागृहात पार पडलेल्या या खास कार्यक्रमात जुन्या आठवणींना नव्याने उजाळा मिळाला. एकेकाळी एकत्र शाळेच्या बाकावर बसणारे वर्गमित्र, आज विविध क्षेत्रात स्थिरावलेले असून, अनेकांनी व्यवसाय, पत्रकारिता, शासकीय सेवा, शिक्षण, वैद्यकीय आणि तंत्रज्ञान क्षेत्रात यशाची शिखरे पादाक्रांत केली आहेत.कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण ठरले ते माजी शिक्षकांचा सन्मान समारंभ. विद्यार्थ्यांनी आपल्या आदरणीय शिक्षकांना शाल, श्रीफळ, पुष्पहार व स्मृतिचिन्ह देऊन कृतज्ञतेचा भाव व्यक्त केला. शिक्षकांच्या डोळ्यांत आनंदाश्रू होते. काही शिक्षकांनी विद्यार्थ्यांना पुन्हा एकदा समोर पाहून, आज पुन्हा वर्ग भरल्यासारखे वाटले, असे भावनिक उद्गार काढले.कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने करण्यात आली. त्यानंतर सामूहिक प्रार्थना व स्वागतगीत सादर करण्यात आले. सर्व माजी



विद्यार्थ्यांनी आपापली ओळख, सध्याची व्यावसायिक स्थिती व शालेय काळातील आठवणी शेअर करताना वातावरण अगदी भावनिक झाले. वर्गातील काही विद्यार्थ्यांनी शाळेतील विनोदी प्रसंग, गमतीदार आठवणी रंगवून सांगितल्या, ज्यामुळे उपस्थितांमध्ये हास्याचे क्षण रंगले.कार्यक्रमात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये काही विदेशात कार्यरत असून, त्यांनी ऑनलाइन स्वरूपात सहभागी होत आपले मनोगत व्यक्त केले. हे पाहून स्नेहमेळाव्याचे आयोजन अधिक संस्मरणीय ठरले.या मेळाव्यासाठी विशेष आकर्षण म्हणून शाळेचा वर्गजमवून 'क्लासरूम सीन' तयार करण्यात आला होता. काही माजी शिक्षकांनी त्या वर्गात पुन्हा एकदा थोडक्यात शिकवणी सत्र घेतले, जे क्षण अक्षरशः सर्वांच्या आठवणीत कायमचे कोरले गेले.कार्यक्रमाच्या शेवटी सर्व उपस्थितांनी एकत्र भोजनाचा आस्वाद घेत एकमेकांशी पुन्हा संवाद साधला. या स्नेहमेळाव्यामुळे आपल्या सर्वांच्या नात्यांना नव्याने बहर मिळाला, असे अनेकांनी व्यक्त केले. भविष्यात अशाच प्रकारचे उपक्रम दर ५ वर्षांनी आयोजित करण्यात यावेत, असा निर्धार या सोहळ्याच्या निमित्ताने करण्यात आला.या यशस्वी आयोजनामागे आयोजन समितीतील श्री.श्रीकांत रंगनाथ खके, सौ.रुपाली सूर्यकांत कापसे (वाकडे ) श्री.सचिन बापुराव डाके यांचा मोलाचा सहभाग होता. सर्व उपस्थितांनी एकमुखाने या कार्यक्रमाचे विशेष कौतुक केले.

दरम्यान, या स्नेहमेळाव्यात २०००-२००१ बॅचच्या मयत झालेले गुरूवर्य शिक्षक कै.शिवाजीराव देशमुख सर, कै.प्रभाकर बेंबळकर सर, कै.वैशाली बेंबळकर मॅडम, कै.वि.ना.स्वामी सर, कै.अनंतराव देशमुख सर, कै.म.ग.कुलकर्णी सर, कै.अंकुशराव देशमुख सर, कै.चंद्रकांतराव देशमुख सर, कै.महादेवअप्पा खोत सर, कै.रामचंद्र वाघमारे सर, कै.प्रल्हाद जोगदंड सर, कै.अश्फाक बेग सर व मयत झालेले वर्गमित्र कै.निसर्ग देशपांडे, कै.गणेश गरूड, कै.अशोक देशमुख, कै.अंकुश देशमुख, कै.रवि बोले, कै.शंकर मस्के, कै.भानुदास बागवाले, कै.गोपाळ फुलझळके, कै.नंदकुमार वाईंगडे यांना उपस्थित शिक्षकवृंद व माजी विद्यार्थ्यांनी भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली.

# डॉ.लक्ष्मण वाघमारे यांना छत्रपती शाहू महाराज समाज भूषण पुरस्कार जाहीर

केज/प्रतिनिधी

अण्णाभाऊ साठे पीपल्स फोर्सच्या माध्यमातून आंबेडकरी चळवळीत योगदाना बद्दल महाराष्ट्रातील ५० मान्यवरांना पुरस्कृत करण्यात येणार आहे. दि.२६ जून २०२५रोजी दुपारी १२- ०० वाजता रुबी हॉटेल नवीन नांदेड सिडको येथे आयोजित करण्यात येणाऱ्या एका विशेष कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते हा पुरस्कार सन्मानपूर्वक देण्यात येणार आहे.

यासाठी समाजसेवा, शिक्षण,सामाजिकन्याय,मानवतावादी विचारां द्वारे आपल्या कार्याचा ठसा उमटवणारे महाराष्ट्रातील ज्येष्ठ नेते,



श्रमिक महासंघाचे संस्थापक अध्यक्ष डॉ.लक्ष्मण वाघमारे यांना नुकतीच डॉक्टरेट पदवी मिळालेली असून छत्रपती राजश्री शाहू महाराज समाज भूषण पुरस्कार जाहीर झाला आहे यामुळे त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे.

# नागनाथराव मुडेगांवकर यांचे निधन

अंबाजोगाई ( प्रतिनिधी)

येथील श्री.नागनाथराव गोविंदराव कुलकर्णी (मुडेगावकर ) (वय - ९३) यांचे रविवारी पहाटे निधन झाले.



त्यांच्या पार्थिवावर रविवारी दुपारी दासोपंत स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या पश्चात पत्नी,दोन मुले,एक मुलगी, सूना, नातवंडे असा परिवार आहे. खोलेश्वर महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.दिगंबर मुडेगांवकर याचे ते वडील होत.

# शेतकऱ्यांनी उच्च प्रतीचे सिमेंन वापरून घरीच दुधाळ गाई तयार कराव्यात - आ.सुरेश धस

आष्टी (प्रतिनिधी)

आष्टी तालुक्यातील बहुसंख्य शेतकऱ्यांची अर्थव्यवस्था ही दुग्ध व्यवसायावर अवलंबून आहे. आष्टी तालुक्याने दुग्ध व्यवसायात मोठ्या प्रमाणात क्रांती करण्यासाठी प्रत्येक शेतकऱ्याने उच्च प्रतीचे सिमेंन वापरून घरीच दुधाळ गाई तयार करण्याचे आवाहन आ. सुरेश धस यांनी केले.

आष्टी तालुका दूध उत्पादक व पुरवठा सहकारी संघ मर्यादित आष्टी यांच्या वतीने मोरेश्वर मंगल कार्यालय येथे दूध उत्पादक शेतकरी चर्चासत्र व मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. पुढे बोलताना आ. धस म्हणाले की, आष्टी तालुक्यामध्ये




दुधाळ गाईंची संख्या कमी प्रमाणात आहे. ती संख्या वाढवण्यासाठी शेतकऱ्यांनी चांगल्या प्रतीचे सिमेंन वापरून घरीच दुधाळ गाई (कालवडी) तयार कराव्यात. त्याचप्रमाणे घरी तयार केलेल्या गाईचा औषधोपचार खर्चही कमी असतो. जनावरांचा आजार खर्च कमी करण्यासाठी गोठा स्वच्छ ठेवणे गरजेचे आहे. प्रत्येक शेतकऱ्याने गोठा आठवड्यातून एकदा तरी निर्जंतुक करणे आवश्यक आहे. तसेच मुरघास करण्यासाठी बॅगचा वापर न करता जमिनीवर हौद करून मुरघास केल्याने त्यावर बुरशी येत नाही व मुरघास खराब होण्याचे प्रमाण अत्यल्प असते. यासाठी शेतकऱ्यांनी जमिनीवर हौद करूनच उच्च दर्जाची मका वापरून कणसासहित मकाचा मुरघास करणे गरजेचे आहे. या कार्यशाळेत डॉ. जालिंदर वांढरे, डॉ. संतोष गवारे, डॉ. मंगेश ढेरे, डॉ. बाबासाहेब कुंभार, डॉ. संदीप शिंदे, डॉ. धनंजय राजगुडे, डॉ. शशिकांत कारखेले या पशुवैद्यकीय डॉक्टर व पशुधन विकास अधिकाऱ्यांनी दूध उत्पादक शेतकऱ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. या कार्यशाळेमध्ये दुधाळ गाईची निवड करणे, पशु आहार व्यवस्थापन करणे, जनावरांचे घरगुती प्राथमिक उपचार व आयुर्वेदिक उपचार करणे, वंध्यत्व निवारण व दुबार ए. आय. करण्याचे कारणे व उपाययोजना, वंशावळ सुधारणा कृत्रिम रेतन व स्वार्टेड सिमेंन्सवर मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी तालुका दूध संघाचे चेअरमन शांतीलाल भोसले, कार्यकारी संचालक मच्छिंद्र धनवडे, दिनकर दाणी मामा, मोहन झांबरे सर्व संचालक मंडळ तालुक्यातील सर्व छोटे मोठे व मध्यम दूध उत्पादक शेतकरी दूध संकलन करणारे चेअरमन महिला दूध उत्पादक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अमेरिकेचा इराणमध्ये घुसून हल्ला!

## अनेक अणुऊर्जा केंद्रांवर टाकले बॉम्ब

गेल्या काही दिवसांपासून व्यक्त केली जात असलेली शक्यता खरी ठरली. इस्रायलइराण संघर्षात अमेरिकेने उडी घेतली आहे. अमेरिकेने इराणमध्ये घुसून हल्ले केला. इराणच्या तीन अणुऊर्जा केंद्रांवर अमेरिकेच्या लष्कराने बॉम्ब वर्षाव केला.अमेरिकेच्या इराणविरोधातील मोहिमेची अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी माहिती दिली.अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी ट्रूथ सोशल मीडिया



प्लॅटफॉर्मवरून याची माहिती दिली. अमेरिकेने इराणच्या फोर्डो, नतांज आणि इस्फहान या तीन ठिकाणच्या अणुऊर्जा केंद्रांवर हल्ले केले आहेत. हवाई दलाने इराणमधील अणुऊर्जा केंद्रावर बॉम्बेचा वर्षाव केला.

# वाळू वाहतूक करणारा टॅक्टर पकडला



चकलांबा (प्रतिनिधी)

पोलीस ठाणे हद्दीतील सुरळेगावमध्ये चोरट्या मार्गाने एक टॅक्टर वाळू वाहतूक करणारा असल्याची माहिती मिळाल्यावरून सपोनि संदीप पाटील यांनी आपल्या अंमलदार यांना सूचना करून नदीपात्रात दबा धरून बसण्याच्या सूचना केल्या होत्या.त्यानुसार टॅक्टर पात्रता वाळू काढण्यासाठी आला असता दोन अंमलदार यांनी त्या टॅक्टर चालकाला ताब्यात घेत ६ लाख ५० हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे.याप्रकरणी टॅक्टर चालक आरोपी - आकाश कोंडीराम भंडारे वय २२ रा. सुरळेगाव ता. गेवराई याचे विरोधात पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही कारवाई पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कॉंवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांचे मार्गदर्शनाखाली चकलांबा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप पाटील,पो.ह.पवार,पो.ह. राऊत यांनी केली.

# शिरूरकासारमध्ये कृषी अधिकारी पदाचा गोंधळ!

## महिनाभरात ना जुना अधिकारी जाईना ना नवा अधिकारी हजर होईना

शिरूरकासार, ( प्रशांत बाफना)

तालुका कृषी आधिकारी यांची प्रशासकीय बदल्यानंतर आहिल्यानगर वरुन मोहीम आधिकारी आसलेले अमृत गांगोर्ड यांची शासनाकडून नियुक्ती करण्यात आली त्याला महिन्याचा कालावधी होत आला असला तरी नविन कृषी आधिकारी हजार होण्यास उत्सुक नसल्याचे स्पष्ट दिसून येत आहे.तर येथील बदली झालेले कृषी अधिकारी यांनी चार्ज सोडला नासल्याने शासनाच्या आदेशाची यांच्या कडून पायमल्ली होत आहे

येथील कृषी आधिकारी यांना तिन वर्ष पुर्ण झाल्या नंतर त्यांची बदली २८ मे ला झाली आहे. शासन आदेशानुसार बदली झालेल्या आधिकारी यांनी तात्काळ आपल्या समकक्ष कनिष्ठ आधिकारी यांना चार्ज देऊन बदली ठिकाणी रूजू होणे आदिशीत आसतांना येथील पुर्वचे बदली झालेले आधिकारी कोण त्या नियमानुसार चार्ज सोडण्यास तयार नाहीत तर शासनाकडून कृषी आधिकारी पदावर नविन कृषी आधिकारी अमृत गांगोर्ड रूजु होत नाहित तर त्या पदवार शासनाकडून दुसऱ्या आधिकारी का नियुक्त होत नाही आसा शेतकरीवर्ग कडून चर्चा होत आहे.सध्या खरीप हंगामात तालुक्याला कृषी आधिकारी नसल्याने शेतकरीवर्ग ला मोठ्या प्रमाणावर समस्यां निर्माण होत आहे. या कडे पालकमंत्री अजित पवार, मंत्री पंकजा मुंढे, आमदार सुरेश धस लक्ष घालणार का

हे पत्रक, मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक श्री वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटर्स ॲण्ड पब्लिशर्स, मोंढा रोड,बीड जि.बीड -४३११२२ येथे छापून साप्ताहिक शिववाणी बीड कार्यालय : घर नं.१०२, छत्रपती कॉलनी, क्रांती नगर, तहसीलच्या मागे, बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथून प्रसिध्द केले. (सर्व वाद बीड न्यायकक्षेत).

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT INDRADHANUSHYA PRINTERS & PUBLISHERS, MONDHA ROAD, BEED, DIST.BEED-431122 AND PUBLISHED AT H.No.102, CHATRAPATI COLONY, KRANTI NAGAR, TAHASIL BACKSIDE, BEED-431122(MAHARASHTRA) (JURISDICTION AT BEED)

# शिवाजी भरोसे यांच्या प्रयत्नांना यश



## साडेगाव येथे १०० के.व्ही. डीपी तात्काळ बसविण्यात आला

परभणी ।प्रतिनिधी

तालुक्यातील साडेगाव येथे भाजपा जिल्हाध्यक्ष शिवाजी भरोसे यांच्या प्रयत्नांतून १०० केव्ही डीपी बसवण्यास प्रशासनाने मंजुरी देऊन तात्काळ काम पूर्ण केले. त्यामुळे गावकऱ्यांना लाईट संदर्भात होणारी गैरसोय टळणार आहे,श असे भारतीय जनता पार्टीचे शिवाजी भरोसे यांनी सांगितले.साडेगाव येथील ग्रामस्थांच्या वतीने १०० के.व्ही. डीपीची मागणी गेल्या अनेक वर्षांपासून करण्यात येत होती, यासाठी भारतीय जनता पार्टीचे शिवाजी भरोसे यांनी महावितरण विभागाकडे पाठपुरावा केला. या मागणीची दखल घेत तात्काळ काम पूर्ण करून दिले. याबद्दल यावेळी नवनिर्वाचित जिल्हाध्यक्ष शिवाजी भरोसे यांचा गावकऱ्यांच्या वतीने भव्य सत्कार करण्यात आला.यावेळी भाजपा परभणी महानगर जिल्हाध्यक्ष शिवाजी भरोसे, सरपंच दिलीपराव देशमुख, प्रसादराव नाईक, शेषेराव भांगे, भीमराव बसुळे, भाजपा मंडळाध्यक्ष्य दैवत लाटे, उत्तमराव देवडे, सुरेशराव बनसावडे, बाळासाहेब नाईक, हेमंत देवडे, केरबा गायकवाड, कपिल कुमार देवडे, अक्षय नाईक, रामा गडगीळे, विशाल देवडे, आदित्य देवडे, सचिन गडगीळे, केशव नाईक, बाबुराव गलांडे, एकनाथ बसुळे, अजय शिंदे, करण नाईक, लक्ष्मीकांत साडेगावकर, विठ्ठल देवडे आदीं सह गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आधुनिक तंत्रज्ञान आणि नाविन्यपूर्ण प्रयोगांमुळे शेतीची भरभराट होईल - आ.डॉ.गुट्टे

'नाविन्यपूर्ण शेती' कार्यशाळा संपन्न

गंगाखेड ।प्रतिनिधी

अवकाळी पाऊस आणि अस्मानी संकटामुळे शेती उद्योग सातत्याने अडचणीत येत आहे. उत्पादन चांगले मिळाले की, भाव नसतो आणि भाव असला की, पुरेसे उत्पादन मिळत नाही, हे चित्र आपण वारंवार पाहतो. त्यामुळे शेती हा तोट्याचा व्यवसाय वाटू लागला आहे. तरीही काळ्या आईची इमानेइतबारे सेवा करणारा आपला बळीराजा फारच आशादायी असतो. कारण, आपल्या शेतीवर त्याची निष्ठा असते. प्रेम आणि जिव्हाळा असतो. त्यामुळे शेतीतून चांगले उत्पादन आणि उत्पन्न मिळवायचे असेल, तर प्रत्येकाने तंत्रज्ञानाची कास धरली पाहिजे. कारण, आधुनिक तंत्रज्ञान आणि नाविन्यपूर्ण प्रयोगांमुळे शेतीची भरभराट होईल, असे प्रतिपादन स्थानिक आमदार डॉ.रत्नाकर गुट्टे यांनी केले.

तालुक्यातील मौजे.बनपिपळा येथे आयोजित 'नाविन्यपूर्ण शेती' कार्यशाळेत सहभागी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. याप्रसंगी त्यांनी तालुक्यासह जिल्ह्यातील शेतीक्षेत्र, पिकांचे प्राधान्य, उत्पादन क्षमता, आयात-निर्यात, खरीप पिके, रब्बी पिके, ऊस आणि कापूस लागवड, पाण्याची उपलब्धता, अस्मानी व नैसर्गिक संकटे, शासकीय योजना आणि बदलते तंत्रज्ञान याविषयी सविस्तर विवेचन केले. तसेच बदलत्या काळाला अनुसरून शेती प्रयोग करण्याचे आवाहन केले.

पुढे बोलताना आ.डॉ.गुट्टे म्हणाले की, जगभरातील अनेक लोकांसाठी उत्पन्न आणि अन्नाचा स्रोत निर्माण करण्यात शेती हा एक मोठा वाटा आहे. गेल्या काही वर्षांत या क्षेत्राने विविध शेती पद्धती आणि तंत्रांमध्ये अनेक बदल आणि प्रगती पाहिली आहे. शेती उत्पादन सुधारण्यासाठी आणि खर्च कमी करण्यासाठी नैसर्गिक संसाधने आणि प्रक्रियांचा वापर करण्याची आवश्यकता आहे. वर्तमान काळात अजैविक खतांचा वापर केला जातो. तसेच अगदी कमी प्रमाणात कीटकनाशके वापरली जातात. वेगवेगळ्या ट्रॅक्टर आणि यंत्रसामग्रीचा वापर केला जातो. गेल्या काही वर्षांत तंत्रज्ञान कृषी क्षेत्रात अत्यंत उपयुक्त असल्याचे सिद्ध झाले आहे.

शेतीच्या विविध पैलूंमध्ये विकसित तंत्रज्ञानाचा वापर केला जाऊ शकतो. जसे की, तणनाशके, कीटकनाशके, खते आणि सुधारीत बियाण्यांचा वापर. शेतकरी आता अशा भागात पिके घेऊ शकतात, जिथे असे मानले जात होते की ते पिकवू शकत नाहीत. परंतु हे केवळ कृषी जैवतंत्रज्ञानामुळे शक्य झाले आहे. उदाहरणार्थ, अनुवांशिक अभियांत्रिकीने इतर वनस्पती किंवा प्राण्यांच्या जनुकांमध्ये काही विशिष्ट गाड्या घालणे शक्य केले आहे. अशा अभियांत्रिकीने पिकांना कीटक आणि दुष्काळासाठी अधिक प्रतिरोधक बनवले आहे. तंत्रज्ञानाच्या मदतीने, शेतकरी कार्यक्षमता आणि सुधारित उत्पादनासाठी कोणत्याही प्रक्रियेचे विद्युतीकरण करू शकतात. म्हणून शेतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्याचे अनेक फायदे आहेत, असेही आ.डॉ.गुट्टे यांनी आवर्जून सांगितले.

बदलत्या तंत्रज्ञानाचा कृषी क्षेत्रात सुध्दा मोठ्या प्रमाणात वापर वाढला आहे. एआय सारखे तंत्रज्ञान शेतीचे धोरण अधिक बळकट करू पाहात आहे. तंत्रज्ञानाच्या मदतीने शेती करणे सोपे होत आहे. अशा काळात आपण सुध्दा विकसित तंत्रज्ञानाची कास धरली पाहिजे. पारंपरिक शेती पध्दतीला फाटा देऊन नाविन्यपूर्ण उपक्रम व प्रयोग हाती घेतले पाहिजेत, असेही आवाहन आ.डॉ.गुट्टे यांनी केले. यावेळी राष्ट्रीय समाज पक्ष व गुट्टे काका मित्र मंडळाचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच शेतकरी बांधव उपस्थित होते.



## शारदा महाविद्यालयात जागतिक योग दिन साजरा

परभणी ।प्रतिनिधी

येथील शारदा महाविद्यालयात शारीरिक शिक्षण विभागाच्यावतीने जागतिक योग दिन साजरा करण्यात आला. जागतिक योग दिनाच्या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बबन पवार हे अध्यक्ष म्हणून उपस्थित होते तर योगतज्ञ म्हणून डॉ. नितीन बावळे उपस्थित होते. प्राचार्य डॉ. बबन पवार यांनी योगासनाचे महत्त्व, आजच्या धकाधकीच्या व तणावपूर्ण जीवनामध्ये योग साधना अत्यावश्यक व महत्त्वाची आहे हे आपल्या मार्गदर्शनातून सांगितले व प्रत्यक्ष आसणे करून त्या आसनाचे महत्त्व व ते आसन कुठल्या अवयवाला व कुठल्या व्याधीला महत्त्वाचे आहे हे सांगितले. डॉ . नितीन बावळे यांनी उपस्थितांकडून योगासने, प्राणायाम करून घेतले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. श्याम पाठक यांनी केले तर आभार डॉ. बी आर पाटील यांनी मांडले . हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कार्यालय प्रमुख सुरेश जयपूरकर, तुकाराम पवार, भगवान रिठाड, राजाराम मूत्रटकर व संतोष एडके यांनी प्रयत्न केले



## योग दिनउत्साहात साजरा

सावळदबारा ।प्रतिनिधी

सोयगाव तालुक्यातील सावळदबारा येथेयोग दिनसाजरा करण्यात आलासावळदबारा येथील जय कालंका देवी शिक्षण संस्था संचालित शिवाजी माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय व कै.लक्ष्मणराव भिमराव कोलते पाटील महाविद्यालय व कै लक्ष्मणराव भिमराव कोलते पाटील इंग्रजी प्राथमिक शाळा मध्ये दिनांक २१ जून रोजीयोग दिनसाजरा करण्यात आला यावेळी प्राचार्य नारायण कोलते,श्रीमती रत्ना कोलते,बी.वाय.खमाट,व्ही.एस.राजपुत, बी. बी. ससाणे,व्ही.पी.पाटील,पी.व्ही.शेळके, जीवन कोलते,एस. पी. जोशी,व्ही. के. जाधव,एस. जी. राठोड,डि. एन. राठोड, भूषण देसले, आजबराव चव्हाण,शाम जाधव,शिक्षक.कर्मचारी. विद्यार्थी उपस्थित होते



## भाजपा तर्फे महिला बचत गट व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

परभणी: भारतीय जनता पार्टी परभणी महानगर तर्फे आज माईलस्टोन प्रायमरी स्कूल माळी गल्ली परभणी येथे दिनदयाळ अंत्योदय स्वंय् सहाय्यता महीला बचत गट व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सन्मानपत्र देऊन करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांना जिल्हाध्यक्ष शिवाजी भरोसे यांनी मार्गदर्शन केले या कार्यक्रमाचे आयोजन प्राचार्या सौ. भाग्यश्री शिंदे मॅडम, सुत्रसंचलन संतोष व्ही जाधव, आभार प्रदर्शन श्री विजय शेटे यांनी केले.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष भाजपा महानगर जिल्हाध्यक्ष शिवाजी भरोसे, प्राचार्य सौ.भाग्यश्री शिंदे मॅडम, ज्योती ताई डूब्बे, संघई ताई, घोडके ताई, पुजा शेटे, नितीन वैद्य, आभिक्षे घंटी आदिसह महीला व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते उपस्थित होते.

# परभणी शहरात संत नामदेव महाराज पालखीचे आगमन

## हजारो भाविकांनी घेतले पालखीचे दर्शन

परभणी/प्रतिनिधी

शहरात श्री संत नामदेव महाराज यांच्या पालखीचे आगमन शनिवारी (दि.२१) दुपारी ४ वाजण्याच्या सुमारास झाले. ठिक-ठिकाणी पालखीचे स्वागत करून हजारो भाविक, नागरीकांनी श्रीसंत नामदेव महाराज पालखीचे दर्शन घेत विठ्ठल विठ्ठलच्या जय घोषाने परिसर दणाणून सोडला.

हिंगोली जिल्हयातील श्रीक्षेत्र नरसी नामदेव येथून दरवर्षी श्रीसंत नामदेव महाराज यांची पालखी आषाढी एकादशीनिमित्त पंढरपुराकडे रवाना होते. यंदाही ही पालखी नरसी नामदेव येथून निघून औंढा - नागनाथ शिरड शहापूर - जवळा बाजार - झिरो फाटा मार्गे परभणी शहरात शनिवारी दुपारी दाखल झाली. शुभ्रवस्त्र परिधान केलेले भाविक, वारकरी हातात टाळ, मृदंग आणि खांद्यावर भगवी पताका घेऊन विठ्ठ नामाच गजर करीत पायी चालत आषाढी एकादशीच्या पुर्वसंध्येला श्रीक्षेत्र पंढरपूर येथे पोहचते. संत नामदेव



महाराजांच्या या पालखी समवेत हजारो वारकरी, महिला, पुरूष आणि आबाल वृध्द पालखी सोबत पायी चालत जवळपास महिन्याभराच्या पदयात्रेनंतर पुढील महिन्यात येणार्या आषाढी एकादशीला भगवान विठ्ठलाचे मनोभावे दर्शन घेतात.

परभणी शहरात पालखी, वारकर्यांचे आगमन होताच जागोजागी स्वागत करण्यात आले. दरम्यान हजारो भाविकांनी संत नामदेव महाराजांच्या पालखीचे दर्शन घेतले. तर पालखी मार्गात अनेक ठिकाणी वारकरी, दिंडीकरी आणि भाविकांसाठी पाणी, फराळ, बिस्कीट आणि उपवासाच्या पदार्थांचे वाटप करण्यात आले.

# टाकळी कुं. येथील मुख्य रस्त्याच्या कामाचे आनंद भरोसे यांच्या हस्ते उद्घाटन

परभणी ।प्रतिनिधी

ग्रामविकास राज्यमंत्री योगेश कदम यांच्याकडून ग्रामविकासाअंतर्गत अल्पसंख्याक निधी मूलभूत सुविधेसाठी परभणी विधानसभेतील मौजे टाकळी (कुं.) येथे मुख्य रस्त्याच्या कामासाठी २५ लक्ष निधी उपलब्ध करून त्याचे उद्घाटन शिवसेना जिल्हाप्रमुख आनंद भरोसे यांच्या हस्ते करण्यात आले. टाकळी (कुं.) येथील नागरिक मागील अनेक वर्षांपासून मूलभूत सुविधांपासून वंचित होते. परंतु नागरीकांच्या मागणीनुसार येथील अनेक कामे आनंद भरोसे यांनी मार्गी लावली आहेत.

याप्रसंगी आनंद भरोसे म्हणाले की, ग्रामीण भागाच्या वाढत्या नागरीकरणाचा विचार करुनच नियोजनबद्ध विकास करण्याचा प्रयत्न सातत्त्याने मी करत आहे. शहरातील मुख्य रस्त्यासह, अंतर्गत रस्ते, पाणी, आरोग्य, पथदिवे, बंदिस्त गटार अशा मूलभूत प्रश्नांना प्राधान्य देत ती कामे पूर्ण करण्यावर भर देखील दिला आहे. या विकास कामांसाठी मागील अनेक वर्षापासुन जास्तीत जास्त निधी उपलब्ध करुन देण्याचा नेहमीच प्रयत्न केला आहे. केवळ आश्वासने न देता सर्वसमावेशक व शाश्वत विकास करण्यावर सदैव




भर दिला आहे. नागरीकांच्या मुलभूत सेवा सुविधांसाठी मी सदैव आपल्या सोबत भूमिपुत्र या नात्याने प्रत्येक सूख दुखात आहे. येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत महायुतीच्या उमेदवारांना जास्तीत जास्त मताधीक्यांने निवडून द्यावे असे संबोधीत केले व तसेच यापुढेही अशीच विकासात्मक कामे करेल, असे आनंद भरोसे यांनी आश्वासित केले.

यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख आनंद भरोसे, विधानसभा प्रमुख बाळासाहेब पानपट्टे, शिवसेना तालुकाध्यक्ष प्रभाकरराव कदम, शिवसेना उपजिल्हाप्रमुख प्रल्हादराव होगे पाटील, प्रकाशराव सामाले, सुंदरराव देशमुख, रोहन सामाले, तुकाराम घोलप, शंकर राऊत, अशोक कदम, संतोष सामाले, कान्हा पुके, आदि गावातील जेष्ठ नागरिक, महिला व तरुण मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शेततलावात तिघेजण बुडाले दोघांचा दुर्दैवी मृत्यू: एक गंभीर

गडब/सुरेश म्हात्रे

पेण तालुक्यातील बेणसे सिध्दार्थ नगर येथील गावाखाली असणाऱ्या एका शेततलावात (सालडोली) पोहण्यासाठी गेलेले तीन तरुण बुडाल्याची घटना शुक्रवारी (दि.२०) घडली. तरुण बुडाल्याची खबर वाऱ्यासारखी पसरली आणि त्यांना बाचविण्यासाठी तातडीने अनेकजण शेततलावावर पोहचले. मोठ्या शनि त्यांना बाहेर काढण्यात आले. उपचारादरम्यान दोघांचा मृत्यू झाला असून, एकावर उपचार सुरु आहेत. बुडालेल्या तरुणांमध्ये एकाच कुटुंबातील जोहेब जाकीर अत्तर (१७), मिझान जाकीर अत्तार (१४), अश्फाक अली (१६) यांचा समावेश आहे. वा



बुडालेल्या तरुणांना काही तरुणांनी बाहेर काढून तात्काळ रिलायन्स नागोठणे कंपनीच्या फॅमिली वेल्फेअर सेंटर मध्ये आणण्यात आले, येथील डॉक्टर व स्टाफने शर्थीचे प्रयत्न करून प्राथमिक उपचार दिले. आणि, पुढील उपचारासाठी संजीवनी हॉस्पिटलमध्ये पाठवण्यात आले. दरम्यान, शेतीवर जाण्यासाठी रस्ता नसल्याने बचावकार्यात मोठे अडथळे आले. बुडालेल्या तरुणांना नागरिकांनी खांद्यावर उबलून बाहेर आणले. घटनेची खबर मिळताच पेण तहसीलदार तानाजी शेजाळ व नागोठणे पोलीस निरीक्षक सबिन कुलकर्णी रुग्णालयात दाखल झाले. यावेळी स्थानिक तरुणांनी बेगाने मदतकार्य केले. यावेळी नातेवाईकांनी रुग्णालयात मोठी गर्दी केली होती.

# आर.पी. हॉस्पिटलकडून रुग्णांसाठी मोफत बस सेवा

परभणी ।प्रतिनिधी

परभणी येथील आर.पी. हॉस्पिटल अँड रिसर्च इन्स्टिट्यूटने रुग्णसेवेच्या उद्देशाने आणि रुग्णांच्या गैरसोयी टाळण्यासाठी एक महत्त्वाचा उपक्रम हाती घेतला आहे. परभणी बस स्थानक ते आर.पी. हॉस्पिटल, पाथरी रोड, परभणी या मार्गावर रुग्ण आणि त्यांच्या नातेवाइकांसाठी मोफत बस सेवा सुरू करण्यात आली आहे. ही सेवा सकाळी ९ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत दर अर्ध्या तासाला उपलब्ध असेल. अशी माहिती आमदार डॉ राहुल पाटील यांनी दिली.

या सेवेमुळे विशेषतः ग्रामीण भागातील रुग्णांना वैद्यकीय सुविधा मिळवण्यासाठी प्रवास सुलभ होणार आहे. या सेवेचा उद्देश रुग्णांना वेळेवर हॉस्पिटलपर्यंत मोफत पोहोचण्यास मदत करणे हा आहे.मोफत वैद्यकीय तपासणी आणि गरीब गरजू रुग्णांना मोफत सर्व सामान्य रुग्णांना परवडणाऱ्या वैद्यकीय सुविधा अत्यल्प दरात उपलब्ध करून देण्याची घोषणा केली आहे. यामध्ये औषधे, रक्त तपासणी, चठख, उढ स्कॅन, सोनोग्राफी आणि एक्स-रे यांचा समावेश आहे. या सुविधांमुळे आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या रुग्णांना दर्जेदार वैद्यकीय सेवा मिळणे शक्य होईल.

आर.पी. हॉस्पिटलचे प्रमुख आणि आमदार डॉ. राहुल पाटील यांनी या उपक्रमाबद्दल सांगितले, रुग्णांना वेळेवर आणि मोफत वैद्यकीय सेवा मिळावी, यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. मोफत बस सेवेमुळे ग्रामीण भागातील रुग्णांना हॉस्पिटलपर्यंत पोहोचणे सोयीचे होईल आणि त्यांचा उपचाराचा प्रवास सुखकर होईल. तसेच, मोफत तपासणी आणि परवडणाऱ्या दरातील वैद्यकीय सुविधांमुळे प्रत्येक रुग्णाला दर्जेदार उपचार मिळतील. हॉस्पिटलचे अधिष्ठाता डॉ. प्रमोद शिंदे यांनी सर्व नागरिकांना आवाहन केले आहे की, या मोफत बस सेवेचा आणि वैद्यकीय सुविधांचा जास्तीत जास्त रुग्णांनी लाभ घ्यावा असे आव्हान डॉ. शिंदे यांनी केले.

# शेतकरी कर्जमाफीसाठी सात दिवस अन्नत्याग यशस्वी आंदोलन करणाऱ्यांचा मटकऱ्हाळा येथील शेतकऱ्यांच्या वतीने सत्कार

परभणी ।प्रतिनिधी

मा. बच्चुभाऊ कडू यांच्या सोबत शेतकरी कर्जमाफी व इतर १७ मागण्यांसाठी अन्नत्याग आंदोलनामध्ये सहभागी होऊन स्वतः सात दिवस अन्नत्याग आंदोलन करणाऱ्या प्रहार जनशक्ती पक्षाच्या पदाधिकाऱ्यांचा व कार्यकर्त्यांचा आज परभणी तालुक्यातील मटकऱ्हाळा येथील शेतकरी व ग्रामस्थांच्या वतीने जाहीर सत्कार करण्यात आला. यात प्रहार जनशक्ती पक्षाचे जिल्हा प्रमुख शिवलिंग बोधने, पाथरी तालुका प्रमुख दीपक खुडे, सोनपेठ तालुका प्रमुख अशोक मस्के पालमचे बालाजी पौळ यांचा सत्कार करण्यात आला.

मा. बच्चुभाऊ कडू यांच्या सोबत शेतकरी कर्जमाफी, दिव्यांगाना सहा हजार रुपये मानधन, पेरणी ते कापणी चा खर्च एमआरईजीएस मधून करावा यासह एकूण १७



मागण्यासाठी गुरुकुंज मोझरी, जिल्हा अमरावती येथे दि. ०८ जून २०२५ ते दि. १४ जून २०२५ पर्यंत सतत सात दिवस अन्नत्याग आंदोलन करून राज्य सरकारकडे मागण्या मान्य करून घेण्याचे यशस्वी आंदोलन करून परभणी जिल्ह्यातील शेतकरी दिव्यांग शेतमजूर व निराधारांचा आवाज सरकार दरबारी अन्नत्याग आंदोलनाच्या माध्यमातून यशस्वीरित्या मांडल्या बद्दल हा सत्काराचा कार्यक्रम घेण्यात आला यावेळी मटकऱ्हाळा येथील शेतकरी, दिव्यांग व ग्रामस्थांनी मा. बच्चुभाऊ कडू यांचे व अन्नत्याग आंदोलनामध्ये सहभागी होणाऱ्या परभणी जिल्ह्यातील प्रहार जनशक्ती पक्षाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांचे आभार मानले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक प्रहार जनशक्ती पक्षाचे तालुकाप्रमुख उद्धव गरुड यांनी केले तर आभार प्रदर्शन माजी सरपंच भागवतराव पाटील गरुड यांनी केले. कार्यक्रमाला शाहूराव गरुड, जगन्नाथराव गरुड, भगवानराव गरुड, विलासराव गरुड, हेमराज गरुड, सुरेशराव चेअरमन, वसंतराव गरुड, माणिक गरुड , बबनराव गरुड , संदीप राऊत, प्रताप राऊत, जगन्नाथ गरुड, पृथ्वीराज गरुड, मुंजाजीराव गरुड, गजानन गरुड, रामभाऊ गुरुड, दासा गरुड, ज्ञानोबा गरुड, सुभाष भाऊ गरुड, उत्तमराव गरुड, मुंजाजीराव मुकदम , ज्ञानोबा जाधव, तुकाराम गरुड, प्रताप गरुड, हनुमान गरुड, स्वप्निल सोंने, कोंडीबा सूर्यवंशी, शालिक येडे, गंगारामजी राऊत, राजकुमार राऊत, गंगारामजी लिजडे, नारायण लिजडे ,शेषराव लिजडे, नागू बहिरे, सतीश हरकळ, रमेश हरकळ, उद्धवराव गरुड, विनायक गरुड, प्रभू गरुड, राम गरुड, वैभव गरुड,

# योगभवन बा-हाळी येथे आंतराष्ट्रीय योग दिन व योगभवन वर्धापन दिन उत्साहात साजरा

मुक्रमाबाद ।प्रतिनिधी

मुखेड तालुक्यातील बाऱ्हाळी येथे पतंजली योग भवन वर्धापन दिन व २१ जून आंतरराष्ट्रीय योग दिवस पाच दिवस योग शिबिर घेऊन उत्साहात साजरा करण्यात आला या कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.सिध्ददयाळ शिवाचार्य महाराज बेटमोगरेकर होते तर उद्घाटक डॉ वीरुपक्ष शिवाचार्य महाराज मुखेडकर यांच्या हस्ते करण्यात आले या शिबिरात महिला पुरुष विद्यार्थी यांच्यासह अनेक



योग साधक योग केले पतंजली योग भवन बाऱ्हाळी येथे योग भवन एक वर्षाखाली स्थापन करण्यात आले होते या योग भवन मध्ये एक वर्षापासून निरंतर आणि निशुल्क योग चालते योग प्रशिक्षक हरिद्वार प्रशिक्षित संध्याताई मठदेवरु व सन्मुख मठदेवरु बाल योगिनी दीक्षा मठदेवरु या परिवाराने बाऱ्हाळीत निशुल्क आणि निरंतर योग शिकवतात याला एक वर्ष पूर्ण झाले या निमित्ताने योग भवन वर्धापन दिन व २१ जून जागतिक योग दिवस यानिमित्ताने पाच दिवस योग शिबिर घेण्यात आले या शिबिराचे उद्घाटन सौ अंजलीताई देशपांडे व सौ अपर्णाताई देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले २१ जून रोजी भव्य दिव्य योग शिबिर ठेवण्यात आले यात अनेक योगसाधक योग केले वर्धापन दिन २१ जून जागतिक योग दिवस या निमित्ताने डॉ सिध्ददयाळ बेटमोगरेकर महाराज व डॉ विरुपक्ष शिवाचार्य महाराज यांनी या शिबिरात मार्गदर्शन केले संध्याताई मठदेवरु यांनी करो योग रहो निरोगचा नारा लावून सर्वांना निरंतर

योग शिकवण्याचे संकल्प केले आणि सर्वांना दररोज योग करणे लंगरजेचे असल्याचे सांगितले यावेळी सूत्रसंचालन शिवाजी जाधव यांनी केले यावेळी उपस्थित श्रीमती विजयाताई देशपांडे राजन देशपांडे,चंद्रशेखर देशमुख,हाणमंतमामा वाडिकर बालाजी पाटील सकनुरकर व्यंकट महाजन , शिवराज विजापुरे, पांडुरंग महाजन , बळवंत देशपांडे , प्रवीण काशेटवार ,प्रवीण कुमार रेड्डी , लक्ष्मण मिसाळे ,गणेश जाधव, अशोक पंचगट्टे, पत्रकार केशव रापतवार, नरसिंग अस्वले उत्तम वाडिकर आदि मान्यवर उपस्थित होते योग शिबिराचे उद्घाटक अंजलीताई देशपांडे व अपर्णाताई देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले

योग शिबिर संपन्न करण्यासाठी अशोक पाटील, अनिल कोटापले बालाजी जाधव, सतिष. गोरशेटवार, व्यंकट कल्पे बालाजी श्रीमंगले व गजानन कल्पे, नागेश पोतदार म्हाळसाकांत जोशी बळवंत परमाळे , वैभव विजापुरे विनोद वाघमारे ,विजय शिकारे, शाम सोळंके, बालाजी पवार सह योग भवन समीती बाऱ्हाळी

# श्री क्षेत्र भगवानगडाच्या पालखीचे मंगळवारी होणार पंढरपूरकडे प्रस्थान

अहिल्यानगर ।प्रतिनिधी

महाराष्ट्रातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री क्षेत्र भगवानगडाच्या पालखीचे मंगळवार दि.२४ जून रोजी पंढरपूरकडे प्रस्थान होणार आहे.श्री क्षेत्र भगवानगडाचे संस्थापक, ऐश्वर्यसंपन्न श्री संत भगवानबाबा यांनी नारायणगडावर असतानाच मराठवाड्यातून पहिला पायी पालखी सोहळा प्रारंभ केला होता. हीच परंपरा भगवानगडाच्या स्थापनेपासून ते आजतागायत सुरु आहे. श्री क्षेत्र भगवानगडावरुन निघणाऱ्या या पायी पालखी सोहळ्याचे प्रस्थान मंगळवारी दुपारी ठीक ३ वाजता होणार आहे. पालखीचे मुक्काम अनुक्रमे भारजवाडी, बावी, खोकरमोह, करंजवन, डिघोळ, जयवंतनगर, कुंबेफळ, पिंपरी, कुर्डुवाडी, ढेकळेवाडी या ठिकाणी होऊन अकराव्या मुक्कामाला पालखी पंढरपूरमध्ये पोहोचते. दरम्यान प्रस्थानापासून ते पंढरपूरमध्ये पोहोचेपर्यंत अनेक दिंड्या भगवानगडाच्या पायी पालखी सोहळ्यामध्ये सहभागी होतात. यामध्ये प्रामुख्याने अंभोरे येथील भोसले महाराजांची दिंडी, गुंजमुर्ती संस्थान, शेषाबाई संस्थान तांबवा, रामगड संस्थान, विठ्ठलगड संस्थान, रामेश्वर संस्थान, भगवानबाबा संस्थान सुपेसावरगांव, भोगलवाडी संस्थान, राजा हरिश्चंद्र संस्थान, जवळा ग्रामस्थ, बोरकिन्ही ग्रामस्थ, भाग्येश्वर संस्थान तरडगव्हण, गणपतबाबा संस्थान सावरगाव, कुमंडलेश्वर संस्थान



घोगस पारगांव, सिद्धेश्वर संस्थान शिरुर कासार, मायंबा संस्थान भालगांव, भगवानबाबा संस्थान छत्रपती संभाजीनगर-पैठण-आळंदी, कानिफनाथ संस्थान खडकवाडी, केशवराज संस्थान वारणी, कानिफनाथ संस्थान खर्डा, हनुमान टाकळी संस्थान, शहर टाकळी संस्थान, कानिफनाथ संस्थान खोकरमोह, सालसिद्धेश्वर संस्थान मिडसांगवी, संत भगवानबाबा संस्थान तागडगांव इत्यादी संस्थानांचा समावेश होतो. ह.भ.प.महंत श्रीगुरु न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबा यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली निघणाऱ्या या भव्यदिव्य पालखी सोहळ्याच्या प्रस्थानावेळी भगवानगड परिसरातील हजारो भाविकांची उपस्थिती राहणार आहे.

# स्वच्छ सर्वेक्षण ग्रामीण २०२५ मध्ये सर्व गावांनी सहभाग नोंदवावा – सीईओ नतिशा माथुर

परभणी ।प्रतिनिधी

ग्रामीण भागामध्ये घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापनात निर्माण झालेल्या सुविधांचा वापर तसेच सार्वजनिक ठिकाणी असलेली परिसर स्वच्छता शिवाय प्रत्येक कुटुंबांना भेटी देऊन बदललेल्या मानसिकतेची माहिती घेण्यासाठी केंद्र शासनाच्या वतीने स्वच्छ सर्वेक्षण ग्रामीण २०२५ अंतर्गत पाहणी करण्यात येणार असल्याने सर्व ग्रामपंचायतींनी मिळून लोकसहभाग व श्रमदानातून या सार्वजनिक सुविधांचा पुरेपूर वापर करत परिसराची स्वच्छता करून स्वच्छ सर्वेक्षण ग्रामीण २०२५ मूल्यांकन कार्यक्रमात सहभाग नोंदविण्याचे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी नतिशा माथुर यांनी केले आहे.

जिल्ह्यात दरवर्षीप्रमाणे स्वच्छ सर्वेक्षण ग्रामीण या उपक्रमामध्ये सर्व ग्रामपंचायती सहभागी होत असतात. केंद्र शासनाच्या वतीने प्रत्येक ग्रामपंचायतीची अद्यावत माहिती घेऊन उभारण्यात आलेल्या घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापनाच्या सुविधांची चाचणी व तपासणी करण्यासाठी केंद्र शासनाचे पथक जिल्ह्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर आधारित दिनांक २२ जून २०२५ रोजी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नतिशा माथुर यांनी जिल्ह्यातील सर्व गट विकास अधिकारी, बाल विकास प्रकल्प अधिकारी, सर्व विस्तार अधिकारी यांना निर्देश दिले आहेत. यावेळी सदर मूल्यांकन तपासणीचे सनियंत्रण ग्रामपंचायत विभागाचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.संदीप घोन्सीकर, स्वच्छ भारत मिशनचे उप मुख्य कार्यकारी शिवराज केंद्रे, महिला व बाल कल्याणच्या उप मुख्य कार्यकारी अधिकारी रेखा काळम, शिक्षणाधिकारी सुनील पोलास करणार आहेत.




या पाहणी दरम्यान प्लास्टिक संकलन व व्यवस्थापन म्हणजेच वर्गीकरण केंद्राची पाहणी, खतखड्यांचे व्यवस्थापन, परिसर स्वच्छता तसेच गृहभेटीतून मिळणारी माहिती इत्यादी बाबत गुणांकन होणार आहे. घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापनाच्या सुविधांबाबत थेट निरीक्षणासाठी १२० गुण आहेतग्रामस्थांच्या प्रतिसादासाठी १०० गुण, गावातील सुविधांचा वापराबाबत २४० गुण तर प्रत्यक्ष पाहणी व निरीक्षणा दरम्यान ५४० गुणांची प्रश्नावली असणार आहे असे एकूण १००० गुणांपैकी प्राप्त होणाऱ्या गुणांच्या आधारे देशातील व महाराष्ट्रातील सर्वात स्वच्छ सुंदर गाव व ग्रामपंचायत या मोहिमेदरम्यान घोषित होणार आहे.

# वारकऱ्यांच्या सोयी - सुविधांमध्ये कुठलीही कमतरता भासू देणार नाही - सभापती प्रा. राम शिंदे

अहिल्यानगर /जिल्हा प्रतिनिधी

संस्कार आणि संस्कृती ही आपल्या देशाची व राज्याची खरी ओळख आहे. सामाजिक वैभवाचा सर्वोच्च अनुभव दिंडीच्या माध्यमातून मिळतो. निःस्वार्थ भावनेतून पांडुरंगाच्या ओढीने पंढरपूरच्या दिशेने पायी चालणाऱ्या वारकऱ्यांच्या सोयी-सुविधांमध्ये कुठलीही कमतरता भासू देणार नाही, अशी ग्वाही महाराष्ट्र विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी दिली.

पारनेर तालुक्यातील पिंपळनेर येथील श्री संत निळोबाराय संजीवन समाधी स्थळास राज्यस्तरीय 'ब' वर्ग तीर्थक्षेत्र पर्यटन स्थळ म्हणून घोषित करण्यात आले असून, त्याअंतर्गत विविध विकास कामांचे भूमिपूजन व पिंपळनेर ते पंढरपूर पालखी सोहळ्याच्या प्रस्थान सोहळ्यानिमित्त ते बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर राज्याचे कृषी मंत्री माणिकराव कोकाटे, आमदार काशिनाथ दाते, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, निळोबाराय संस्थानचे अध्यक्ष अशोकराव सावंत, ह.भ.प. डॉ. नारायण महाराज जाधव, डॉ. विकासानंद महाराज मिसाळ, ह.भ.प. मोहनानंद पुरंदरवडेकर महाराज, ह.भ.प. समाधान महाराज शर्मा, उपमुख्य कार्यकारी अधिकारी दादासाहेब



गुंजाळ, तहसीलदार गायत्री सौन्दणे आदी मान्यवर उपस्थित होते.प्रा. राम शिंदे म्हणाले की, हजारो वर्षांची दिंडी परंपरा वारकरी संप्रदायाने श्रद्धेने जपली आहे. कुठलीही अपेक्षा न ठेवता संत व समाधान हेच सर्वश्रेष्ठ मानून वारकरी पांडुरंगाच्या दर्शनासाठी निःस्वार्थ भावनेने निघतो. या यात्रेतून मिळणाऱ्या आत्मिक समाधानाची तुलना इतर कुठल्याही सुखाशी होऊ शकत नाही. शासन व प्रशासन वारकऱ्यांच्या सोयींसाठी खंबीरपणे त्यांच्या पाठीशी उभे आहे. या दिंडी सोहळ्यात स्वतः एक दिवस चालण्याचा मनोदय त्यांनी यावेळी व्यक्त केला. जिल्ह्यातून जाणाऱ्या सर्व दिंड्यांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याचे निर्देशही त्यांनी प्रशासनाला दिले.

कृषी मंत्री माणिकराव कोकाटे म्हणाले की, राज्यभरातून लाखो वारकरी दरवर्षी एकात्मतेचे दर्शन घडवत विठोबाच्या दर्शनासाठी निघतात. कोणाच्याही मदतीची अपेक्षा न ठेवता ऊन, पाऊस, वाऱ्याची तमा न बाळगता चालणाऱ्या या वारकऱ्यांचे आत्मिक समाधान सर्वोच्च आहे. या यात्रेसाठी शासनाने पुरेशा सुविधा उपलब्ध केल्या आहेत. पंढरपूर येथे दोन दिवस 'कृषिमित्र' म्हणून वारकऱ्यांच्या सेवेसाठी उपस्थित राहणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

आमदार काशिनाथ दाते म्हणाले की, पूर्वी अत्यंत कमी वारकरी या दिंडीत सहभागी होत असत. मात्र आता जिल्हाभरातून ६७ दिंड्या पिंपळनेर पालखी सोहळ्यात सहभागी होत असून, ही बाब तालुक्यासाठी अत्यंत अभिमानास्पद आहे. शासनाकडून संस्थानच्या विकासासाठी यावर्षी ७ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

प्रास्ताविक करताना अशोकराव सावंत यांनी सांगितले की, दिंडीत सहभागी वारकऱ्यांसाठी शासनाने पिण्याचे पाणी, फिरते शौचालय, आरोग्य सुविधा, रुग्णवाहिका, प्रत्येक दिंडीसाठी २० हजार रुपये अनुदान, पावसापासून संरक्षणासाठी रेनकोट, तसेच वारी मार्गाची दुरुस्ती यांसारख्या सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. शासनाच्या तीर्थक्षेत्र विकास योजनेअंतर्गत निळोबाराय संस्थानसाठी ७ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

डॉ. नारायण महाराज जाधव व ह. भ. प. समाधान महाराज शर्मा यांचीही समयोचित भाषणे झाली. कार्यक्रमाच्या शेवटी मान्यवरांच्या हस्ते श्रीफळ फोडून निळोबाराय पालखी पंढरपूरकडे मार्गस्थ करण्यात आली. विविध विकास कामांचे भूमिपूजनही यावेळी पार पडले. कार्यक्रमास वारकरी व भक्तगण मोठ्या संख्येने उपस्थित होते

# लातूर येथील कृषी महाविद्यालयाच्या वतीने जि.प.प्रा.शा. खरोळा येथे प्रसन्न वातावरणात योग दिन साजरा

**लातुर/प्रतिनिधी)**

**जागतिक योग दिनाचे औचित्य साधून लातूर येथील कृषी महाविद्यालयाच्या वतीने जि.प.प्रा.शा.खरोळा येथे अगदी उत्साहाच्या वातावरणात योग दिन साजरा करण्यात आला. लातूर येथील ग्रामीण जागरुकता कार्यानुभव कार्यक्रमाच्या अंतर्गत कृषीकन्या व कृषीदुत यांच्यावतीने २१ जून या जागतिक आरोग्य दिनाच्या अनुषंगाने सकाळच्या प्रसन्न वातावरणात शाळेच्या आणि महाविद्यालयांच्या सर्व कर्मचारी, विद्यार्थ्यांच्या आणि गावकऱ्यांच्या उपस्थितीत हा योग दिनाचा कार्यक्रम पार पडला.**

व्यक्तीचा सर्वांगीण आणि सार्वजनिक विकास व्हावयाचा असेल तर आयुष्यात योगाला फार महत्त्व आहे. कारण कुठल्याही व्यक्तीचा शारीरिक, अध्यात्मिक, मानसिक आणि बौद्धिक विकास होण्यासाठी योग अत्यंत महत्त्वाचा असल्याने मानवी जीवनात योगशास्त्राला फार महत्त्व आहे. आयुष्यात इतर सर्व स्तरातील काम करत असताना वा जीवन जगत असताना जर व्यक्तिमत्व विकास हा पूर्णांगाने करून घ्यावयाचा असेल तर, योगाला बाजूला सारता येणार नाही. हे ओळखूनच अगदी जागतिक पातळीवर योगा बाबतीत जनजागृती व्हावी म्हणून २१ जून हा दिवस योगा दिन म्हणून पाळला जातो. आणि मग याच अनुषंगाने जि.प.प्रा.शा.खरोळा,



ता.रेणापुर, जि.लातूर येथे शाळा आणि कृषी महाविद्यालय यांच्या संयुक्तिक विद्यमाने योगा दिन साजरा करण्यात आला.

यावेळी कृषी महाविद्यालयाचे अधिष्ठाता तथा प्राचार्य डॉ.बाबासाहेब ठोंबरे आणि कार्यक्रमाधिकारी डॉ.नितीनजी तांबोळी यांचे सविस्तर मार्गदर्शन लाभले. तर कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून शाळेचे मुख्याध्यापक जी.एम.गुरुमे, प्रमुख पाहुणे म्हणून गावचे सरपंच श्री. धनंजयजी देशमुख, सोबत उपमुख्याध्यापक ए.एम. रेणापुरे यांच्यासह शाळा व महाविद्यालयातील सर्व शिक्षकवृंद, विद्यार्थी-विद्यार्थिनी, कर्मचारी व गावातील प्रतिष्ठांसह ग्रामस्थांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कृषीकन्या कु.शिवाणी लोहार, शरयु मलवाडे, मोहिनी मुळे, सिद्धी नलवडे, अनुष्का नायकुडे, ज्योती कुरडे, अर्चना निम्मेवाड यांच्यासह कृषीदुत प्रथमेश शेप, प्रथमेश मोरे, भास्कर मानकरी, गणेश पाटील, केदार पाटील यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चि. प्रथमेश तर आभार प्रदर्शन कु.सिद्धी नलावडे यांनी केले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.

# उद्योगपती हनुमंत जंजीरे यांना मातृशोक

आष्टी (प्रतिनिधी)

आष्टी तालुक्यातील कुंबेफळ येथील गोविंद उद्योग समूहाचे अध्यक्ष तथा प्रसिद्ध उद्योगपती हनुमंत रावसाहेब जंजिरे यांच्या मातोश्री गं. भा. तुळसाबाई रावसाहेब जंजिरे (वय ९०) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले आहे.त्यांच्यावर त्यांच्या मूळगावी कुंबेफळ येथे रविवार दि. २२ जानेवारी रोजी सायंकाळी ५ वा. अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्यापाठीमागे हनुमंत जंजिरे मुलगा, एक मुलगी, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे.अंत्यविधीस देविदास धस, राजाभाऊ दरेकर, परमेश्वर शेळके, ड. हनुमंत



थोरवे, जयसिंग गव्हाणे, यशवंत खंडागळे, सभापती शत्रुघ्न मरकड, तालुकाध्यक्ष सुनील नाथ, जेष्ठ पत्रकार उत्तम बोडखे, प्रविण पोकळे, चेअरमन शांतीलाल भोसले, सरपंच मनोज थोरवे, सदाशिव मिसाळ, शिरीष थोरवे, पांडुरंग जंजिरे, भारत जाधव, बाळासाहेब शिंदे, बन्सीभाऊ पोकळे, दतोबा वाडेकर, बिट्टू पोपळे, बाळासाहेब थोरवे, भाऊसाहेब झांजे, राजाभाऊ शेळके, महादेव मुंगसे, संजय थोरवे, महेबूब सय्यद, रामदास शेंडगे, सहाय्यक पोलीस निरीक्षक रविकांत वारंगुळे, पोपट धुमाळ, शिवाजी धस, श्रीनिवास पोकळे, पवन चौधरी, के. के. काकडे, गोलेकर साहेब, भारत गव्हाणे, डॉ. दत्तात्रय गणगे, सिताराम झांजे, रावसाहेब भस्मे, चेअरमन गोवर्धन धस, भाऊसाहेब काळे, आर. डी. शिंदे, गजबा शिंदे, बाबासाहेब जाधव यांच्यासह ग्रामस्थ व परिसरातील नागरिक उपस्थित होते.



अंबाजोगाई/प्रतिनिधी

कै. दे.बा.ग.यो.नू.विद्यालय मेडिकल कॉलेज परिसर येथे दि. २१-०६-२०२५ शनिवार रोजी शाळेत जागतिक योग दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. योग शिक्षक मा.श्री. मोरगावकर हे प्रमुख पाहुणे व मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. शाळेच्या वतीने विभाग प्रमुख श्री. श्रीनिवास वैद्य सर यांनी श्री. मोरगावकर सर यांचे यथोचित स्वागत केले. शाळेच्या मैदानावर सर्व विद्यार्थ्यांनी योग प्रात्यक्षिकात सहभाग घेतला. यावेळी शाळेचे विभाग प्रमुख मा.श्रीनिवास वैद्य सर, सर्व शिक्षकवृंद, कर्मचारी व विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जिल्हा परिषद उच्च प्राथमिकशाळा तरनळी शाळेत आंतरराष्ट्रीय योगदिन साजरा

केज/प्रतिनिधी

दि.२१ जुन २०२५ शनिवार रोजी जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा तरनळी केंद्र लव्हुरी ता.केज या शाळेत आंतरराष्ट्रीय योगदिन साजरा करण्यात आला. यावेळी लव्हुरी केंद्राचे केंद्रप्रमुख राधाकिसन कांबळे साहेब,श्री. भारत बाबुराव हांगे सर, श्रीमती गिताताई जीवराज अंडील मॅडम, या शाळेचे अपग्रेड मुख्याध्यापक श्री. राजाभाऊ दत्तात्रय कदम यांनी योगासने कृती करुन दाखविले व मार्गदर्शन करुन सर्वां कडून ही योगासने कृती करुन घेतली.लव्हुरी केंद्राचे केंद्रप्रमुख राधाकिसन सोपानराव कांबळे साहेब यांनी प्रत्येक योगासनांची सविस्तर माहिती दिली. योगासने केल्यानेआपले शरीर मजबूत होते व आरोग्य उत्तम राहते.श्री भारत बाबुराव हांगे सर व श्रीमती गिताताई जीवराज अंडील मॅडम यांनी उत्तम व्यायाम, सकस सुयोग्य आहार याबाबत माहिती दिली. यावेळी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष संपत्ती संपत्ती सरवदे,उपाध्यक्षा सीमा सुधीर




मोहिते,शाळा व्यवस्थापन समिती सदस्य,लव्हुरी केंद्राचे केंद्रप्रमुख राधाकिसन कांबळे साहेब या शाळेचे मुख्याध्यापक श्री.राजाभाऊ दत्तात्रय कदम,श्री.भारत बाबुराव हांगे सर, श्रीमती गिताताई जीवराज अंडील मॅडम, श्रीमती सोनाली भारतराव भुमकर मॅडम,श्री.बाबासाहेब राजाराम मैंद सर, शिक्षण प्रेमी नागरिक, ग्रामपंचायत सदस्य, गावकरी,पिएम पोषण शक्ती निर्माण योजनाचे कामगार श्री.गणेश काशिनाथ माने, विद्यार्थी,विद्यार्थिनी तसेच या शाळेचे माजी विद्यार्थीही या आंतरराष्ट्रीय योगदिन कार्यक्रमात सहभागी झाले.